


॥ ज्योतिर्मय ॥

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष १ ले ❑ अंक २०६ वा ❑ गुरूवार दि.०२ ऑक्टोबर २०२५ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)

विशेष लेख...

# स्वच्छता राखणे प्रत्येक व्यक्तीचे कर्तव्य

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

ज्योतिर्मय साहित्य

गांधी जयंतीच्या पार्श्वभूमीवर शासन, प्रशासन, व लोकांना स्वच्छता आठवत असते. स्वच्छता राखणे हा प्रत्येक व्यक्तीच्या जीवनाचा एक दैनिक भाग आहे.व्यक्तिगत स्वच्छता,आपल्या परिसराची स्वच्छता ,सार्वजनिक स्वच्छता राखणे हे प्रत्येक संरचनेतील व्यक्तींचे कर्तव्य आहे.स्वच्छता राखणे हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे. स्वच्छ वातावरणामुळे आरोग्य सुधारते, रोगराई कमी होते आणि समाजाला निरोगी जीवन जगण्यास मदत मिळते. घराची, सार्वजनिक ठिकाणांची स्वच्छता जपणे, कचरा व्यवस्थापन करणे आणि वैयक्तिक स्वच्छता पाळणे हे या कर्तव्याचा भाग आहेत.

स्वच्छता ही एक सवय आहे जी सर्वांनी आत्मसात केली पाहिजे, कारण ती केवळ वैयक्तिक आरोग्यासाठीच नाही, तर आपल्या समाजाच्या आणि देशाच्या कल्याणासाठीही आवश्यक आहे.स्वच्छतेला केवळ सरकारची जबाबदारी मानण्याऐवजी, प्रत्येक व्यक्तीची जबाबदारी मानून एक समग्र दृष्टिकोन स्वीकारला पाहिजे.

स्वच्छ भारत अभियान राबवून देखील जिथे तिथे अस्वच्छता दिसते.. स्वच्छ भारत अभियानाने ग्रामीण आणि शहरी भागात उघड्यावर शौचास जाणे थांबवण्यासाठी शौचालये बांधण्यावर भर दिला असून, कचरा व्यवस्थापन सुधारले आहे. मात्र, काही समस्या अजूनही आहेत, जसे की बांधलेली शौचालये वापरण्यायोग्य नसणे किंवा अभियानाची व्याप्ती पूर्णपणे स्थानिक पातळीवर पोहोचली नसणे. काही ठिकाणी बांधलेली शौचालये वापरण्यायोग्य नसतात किंवा त्यांच्या वापराबाबत लोकांच्या सवयींमध्ये बदल झालेला नसतो. अभियानाची योजना जरी चांगली असली, तरी काही ठिकाणी तिची अंमलबजावणी अपेक्षेप्रमाणे झालेली नाही. काही भागात अजूनही लोकांना स्वच्छतेचे महत्त्व पटलेले नाही आणि त्यांची याबद्दलची जागरूकता कमी आहे.

स्वच्छतेसाठी बहुआयामी दृष्टिकोनाचा अवलंब करण्याची गरज आहे.म्हणजे वैयक्तिक, घरगुती, सार्वजनिक आणि पर्यावरणीय स्वच्छतेच्या सर्व पैलूंचा समावेश करणे, ज्यामध्ये वर्तन बदल, समुदाय सहभाग, सरकारी धोरणे आणि शाश्वत आर्थिक मॉडेल यांचा समावेश आहे. हे केवळ ''स्वच्छता'' पुरते मर्यादित नाही तर निरोगी सवयींना प्रोत्साहन देणे, जागरूकता वाढवणे, शाश्वत उपाय शोधणे आणि प्रत्येकाची जबाबदारी सुनिश्चित करणे समाविष्ट आहे.

व्यक्तिगतआयामामध्ये हात धुणे, वैयक्तिक स्वच्छता आणि स्वच्छ वातावरण राखणे समाविष्ट आहे.अतिसार, ट्रेकोमा आणि इतर संसर्गजन्य रोग रोखण्यासाठी वैयक्तिक स्वच्छता महत्त्वाची आहे.समुदायांना स्वच्छतेचे महत्त्व पटवून देणे आणि ती सवय लावणे आवश्यक आहे.महात्मा गांधींच्या दृष्टिकोनानुसार, स्वच्छता/ साध्य करण्यासाठी लोकसहभाग आणि स्वयंप्रेरित प्रयत्न आवश्यक आहेत.स्वच्छता मोहिमा आणि धोरणे रोग रोखण्यास आणि निरोगी वातावरण निर्माण करण्यास मदत करतात.सार्वजनिक शौचालये राखण्यात आणि कचरा संकलन सुनिश्चित करण्यात शहरी स्थानिक संस्था महत्त्वाची भूमिका बजावतात.लोकांचे दृष्टिकोन बदलणे, विशेषतः ग्रामीण भागात, आवश्यक आहे जेणेकरून त्यांना वैयक्तिक आणि सामुदायिक स्वच्छता समजेल.वर्तन बदलाला प्रोत्साहन देण्यासाठी शिक्षण आणि जागरूकता कार्यक्रम महत्त्वाचे आहेत.

विकेंद्रित स्वच्छता उपायांसारख्या नाविन्यपूर्ण स्वच्छता तंत्रज्ञानाचा वापर आणि विविध संस्थांसोबत (जसे की स्वयं-मदत गट) भागीदारी स्वच्छता सेवांमध्ये प्रवेश वाढवू शकते.

तंत्रज्ञानाचा वापर स्वच्छता व्यवस्थापन आणि देखरेखीसाठी देखील मदत करू शकतो.स्वच्छ भारत अभियानासारख्या मोठ्या प्रमाणात मोहिमा जनजागृती आणि वर्तन बदलाला प्रोत्साहन देतात, परंतु सरकारी संस्था, आरोग्य मंत्रालये आणि स्थानिक संस्था यांच्यात समन्वय आवश्यक आहे.

स्वच्छता सेवा शाश्वत करण्यासाठी, घानामधील स्वच्छ टीम व्यवसाय मॉडेलमध्ये दिसून आल्याप्रमाणे, स्वच्छता फायदेशीर बनवू शकणाऱ्या व्यवसायांना प्रोत्साहन देणे महत्वाचे आहे.


# बाळासाहेब लबडे यांच्या ''द लास्ट फोकटेल'' इंग्रजी कादंबरीचे प्रकाशन ४ ऑक्टोबरला

**मुंबई** – मराठी कादंबरी ''शेवटची लाओग्राफिया'' चे इंग्रजी भाषांतर ''The Last Folktale'' या पुस्तकाचे प्रकाशन येत्या शनिवार, ४ ऑक्टोबर रोजी मुंबईत आयोजित करण्यात आले आहे. के. जे. सोमैया कॉलेज ऑफ आर्ट्स अँड कॉमर्स, विद्याविहार व मुंबई विद्यापीठाच्या इंग्रजी विभागाच्या संयुक्त विद्यमाने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

लेखक, कवी, गझलकार, समीक्षक, संपादक, गीतकार, अनुवादक, संशोधक प्रा. डॉ. बाळासाहेब लबडे यांच्या कादंबरीचे इंग्रजी भाषांतर प्रा. डॉ. विलास साळुंखे यांनी केले आहे. या पुस्तकाचे प्रकाशन व English Athenaeum – KJSAC चे उद्घाटन सुप्रसिद्ध कवी, लेखक व अनुवादक तसेच साहित्य अकादमी पुरस्कार व विंडहॅम-कॅम्पबेल पुरस्कार विजेते श्री. जेरी पिंटो यांच्या हस्ते होणार आहे.

या कार्यक्रमात लेखक व आयएएस अधिकारी डॉ. लक्ष्मीकांत देशमुख, साहित्य अकादमी पुरस्कार विजेते लेखक श्री.भारत सासणे तसेच अनुवादक डॉ. विलास साळुंखे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहतील.

कार्यक्रम शनिवार, ४ ऑक्टोबर २०२५ रोजी सकाळी ११ वाजता के. जे. सोमैया कॉलेज ऑफ आर्ट्स अँड कॉमर्स, विद्याविहार, मुंबई येथील कॉन्फरन्स रूममध्ये होणार आहे असे प्राचार्य किसन पवार आणि मुंबई विद्यापीठ इंग्रजी विभाग प्रमुख डॉ.सचिन लबडे यांनी कळविले आहे. डॉ. बाळासाहेब लबडे यांची आतापर्यंत अठरा पुस्तके प्रकाशित झालेली आहे यात ४ कवितासंग्रह ४ कादंबऱ्या ३ समीक्षा ग्रंथ आणि ६ संपादित १ अनुवादित पुस्तकाचा समावेश या कलाकृतींना राज्य राष्ट्रीय पातळीवरील ४० पुरस्कार प्राप्त झालेले आहेत.




# भेलके महाविद्यालयात शारदीय नवरात्र उत्सव साजरा

ज्योतिर्मय साहित्य

**सासवड** – शंकरराव भेलके महाविद्यालयात शारदीय नवरात्र उत्सवामध्ये सांस्कृतिक विभागाच्यावतीने दि.१.१०.२०२५ रोजी भोंडला आणि दांडिया उत्सवाचे आयोजन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर तुषार शितोळे सर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते.

शरद ऋतूतील अश्विन महिन्यात हस्त नक्षत्रातील या उत्सवामध्ये शक्तीचे आणि समृद्धीचे प्रतीक असणारा हत्ती याचे पूजन केले जाते, असे सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा संदीप लांडगे यांनी सांगितले. कार्यक्रमाची सुरुवात महाविद्यालयातील महिला प्राध्यापक प्रा. पौर्णिमा कारळे, प्रा वैष्णवी कोंडे प्रा.अंकिता महांगरे, प्रा.ऐश्वर्या धुमाळ आणि महाविद्यालयातील सेवक श्रीमती सीमा देशमुख यांच्या शुभहस्ते हत्ती पूजनाने करण्यात आली. या प्रसंगी माननीय प्राचार्यांनी आपल्या मनोगतात आपली संस्कृती आपले सण उत्सव हे शेती आणि निसर्गाशी संबंधित आहे. त्यांचे जतन करणे हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे असे सांगितले.



या कार्यक्रमाचे संयोजन डॉ. जगदीश शेवते डॉ. रोहिदास ढाकणे प्रा. सहदेव रोडे,प्रा.भगवान गावित , प्रा जीवन गायकवाड, डॉ. सचिन घाडगे,प्रा. दयानंद जाधवर प्रा. महेश कोळपे प्रा.माउली कोंडे डॉ. गणपत आवटे , तसेच प्राध्यापकेतर कर्मचारी सुमित कांबळे, अभिषेक मोरे, धनाजी माने श्रीमती मनीषा मोहिते यांनी केले. महाविद्यालयातील विद्यार्थिनी पौर्णिमा गोळे, निशा दीक्षित, पोर्णिमा कांबळे, साक्षी खुळे, तृप्ती सणस, नेहा वाल्हेकर, श्रेया भरगुडे यांनी कार्यक्रम संयोजनासाठी विशेष परिश्रम घेतले.




# नर्मदा परिक्रमाबाबत ज्येष्ठांना मार्गदर्शन

ज्योतिर्मय साहित्य

**पुणे** – तुमची इच्छाशक्ती असेल तर नर्मदा परिक्रमा करताना ईश्वर तुमच्या पाठीशी असतो कसलीही अडचण येत नाही. नर्मदा परिक्रमा करताना ३२०० कि. मी. प्रवास करावा लागतो. या प्रवासाला जाण्यापूर्वी करावयाची तयारी आणि संपूर्ण प्रवासात घ्यावयाची काळजी यासंदर्भात सुप्रसिद्ध लेखक शरद दाऊतखाने यांनी ज्येष्ठांना मार्गदर्शन केले. पिंपळे सौदागर येथील ऑल सिनियर सिटीझन असोसिएशनच्या वतीने आयोजित '' नर्मदा परिक्रमा एक अध्यात्मिक अनुभूती '' या विषयावरील व्याख्यानात ते बोलत होते. मंगळवार दि. ३० रोजी उन्नती सोशल फाउंडेशनच्या प्रांगणात हा कार्यक्रम झाला. डॉ. सुभाष पवार यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमास व्यासपीठावर उन्नती सोशल फाउंडेशनचे संचालक संजय भिसे, सुभाष पाटील, रमेश वाणी, अनिल कुलकर्णी, यांची व्यासपीठावर उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या प्रारंभी अनिल कुलकर्णी, बाळकृष्ण चौधरी, शशांक लोकरस यांनी गाणी सादर केली. पाहुण्यांचे स्वागत संजय भिसे, भामिनी महाले आणि शोभा राजगुरे यांनी केले. बाळासाहेब चौधरी यांनीही यावेळी मनोगत व्यक्त केले. संजय भिसे यांनी उन्नती सोशल फाउंडेशनच्या अध्यक्षा डॉ. कुंदाताई भिसे यांच्यातर्फे पुरग्रस्तांना पाच लाख रु. मदत दिल्याचे जाहीर करुन उपस्थितांनाही आपापल्या परिने विविध स्वरुपात पुरग्रस्तांना मदत करावयाचे आवाहन केले. प्रास्ताविक आणि सुत्रसंचलन शकुंतला शिंदे यांनी केले. आभार भामिनी महाले यांनी मानले. पुष्पा इंगळे आणि शैलजा लोकरस यांनी सादर केलेल्या पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी दिलीप चौगुले, रमेश चांडगे, सतिश पिंगळे, अशोक कलाल, सुभाष विधाते, शोभा राजगुरे, अनिलकुमार शाह यांनी परिश्रम घेतले.

# वास्तुशास्त्र पेंटिंग

लघुलेख-५९




२७ नक्षत्रातील १६वे नक्षत्र "विशाखा" आहे. या नक्षत्राचा आराध्य वृक्ष, "नागचाफा' असून पर्यायी वृक्ष "वेहंकळ" आहे. 'नागचाफा' लाच "नागकेशर 'असे नांव आहे. या वृक्षाला तीव्र सूर्य प्रकाश सहन होत नाही. या नक्षत्राची धैर्यौषधी 'गुंज' आहे.

गुंज ही एक वन्य 'वेली वर्गीय' वनस्पती, विड्याच्या खाण्याच्या पानात 'गुंजा'ची पाने टाकतात. ही पाने चघळली तरी घसा मोकळा होतो.. एकुणच या नक्षत्राचे आराध्य वृक्ष आणि धैर्यौषधी, औषधी आणि उपयोगी आहेत.

या नक्षत्राची देवता 'इंद्राग्नि' आहे. विशाखा नक्षत्राची, आकृती ही चार तारकांनी बनलेली आहे. एखाद्या तोरणासारखी दिसते. हे नक्षत्र वैशाख महिन्यांत रात्रभर आंकाशात दिसते. जुलै महिन्यात, पहिल्या १५ दिवसांत रात्री ९ ते ११ च्या दरम्यान डोक्यांवर दिसते. 'इंद्र' आणि 'अग्नि' या दोन स्वतंत्र देवता एकत्रित होऊन एक 'देवता शक्ती' अर्थात 'जोडदेवता" बनते. ही देवता उग्र स्वरुपाची आहे. 'ॐ इंद्राग्निभ्यां नमः ह्या नक्षत्रदेवतेचा आहे. या नक्षत्रावर जन्मलेल्या व्यक्ती'तुला' राशीच्या असतात.

'वायु' तत्वाच्या 'तुला' राशीचा स्वामी 'शुक्र' असून या राशीच्या व्यक्तींना आकर्षक पर्सनॅलिटीतील कांही ना कांही वरदान असते, ही राशी पुरुष प्रधान असल्याने, पुरुषां प्रमाणेच महिलांमध्येही अल्प प्रमाणात का होईना परंतु पुरुषी गुण आढळतात. पांढरा आणि गुलाबी रंग या राशीचा अनुकूल रंग आहे.

या नक्षत्राच्या प्रथम चरणाचा स्वामी मंगळ, द्वितीयचा शुक्र, तृतीय चरणाचा स्वामी बुध आणि चतुर्थ चरणाचा स्वामी चंद्र आहे. या नक्षत्रावर जन्मलेल्या व्यक्तींनी, "वास्तुशास्त्र पेंटींग " बनवून घेतल्यास, यांच्या राशीला लाभदायक असलेल्या व्यवसाय वा नोकरीच्या क्षेत्रांमध्ये अधिक गती येते. असा अनुभव आहे. सर्व साधारणपणे पर्यटन विभाग, विदेश संपर्क, ट्रेडींग, दलाली, विदेशी व्यापार, शेती, अभिनय, जाहीरात एजन्सी, प्रकाशन व्यवसाय, संपादन, वैद्य, प्राचार्य, समालोचक अशा व्यवसाय वा नोकरीमध्ये अधिक प्रगती होईल, असे वातावरण या पेंटींग मुळे बनते असा उपयोगकर्त्या जातकांचा अनुभव आहे. रंग आकार आणि मंत्राक्षरे यांच्या यथायोग्य संकल्पना वा प्रभाव जातकांस जेव्हा अनुभवायला मिळतो तेव्हा त्यांचा आत्मविश्वास देखील वाढलेला असतो.

क्रमशः.....

द्वारा एस्.व्ही.एस्. कला प्रतिष्ठान
डॉ. गजानन शेपाळ : 98691 30238




## जात्यावरच्या ओव्या......

शिवाराच्या वाटा
जीवा चाल तरा तरा
भरताराच्या कष्टान
हिरवा शिवार सारा ||२८३||

शिवाराच्या वाटा
निघ बांधून भाकर
तुही बंधाऱ्यावरून
वाट पाहे भरतार ||२८४||

संदर्भ- शांताई इंगळे
संकलन- सौ. मनोरमा बोराडे
सहशिक्षिका, छत्रपती संभाजीनगर

# आनंदघन : लता मंगेशकर




विश्वास देशपांडे
चाळीसगाव
मो.९४०३७४९३९२

ज्योतिर्मय साहित्य

एखादं गाणं सुरु असतं. त्याची रिहर्सल किंवा रेकॉर्डिंग सुरु असताना दीदींच्या कानात मधूनच लता असा आवाज येतो. त्या दचकतात. आवाज तर स्पष्टपणे ऐकू आलेला असतो. त्या चमकून वादकांकडे पाहतात. पण त्यांचे वाद्य वाजवणे नेहमीप्रमाणे सुरूच असते. मग त्या पुन्हा गायला सुरुवात करतात. त्यांच्या म्हणण्यानुसार ज्या ज्या गाण्याच्या वेळी असा आवाज त्यांना ऐकू आला ते गाणं अत्यंत लोकप्रिय होतं.
हरीश भीमाणीनी दीदींना विचारले की हा आवाज तुम्हाला तुमच्या वडिलांचा असावा असं वाटतं का ? त्यावर दीदींनी होय असे उत्तर दिले. त्यावेळी हृदयनाथही उपस्थित होते. ते एवढेच म्हणाले, दीदीच्या गळ्यातून बाबा गात असतात.



दीदी पूर्वी अनेक वेळा आळंदीला जात असत. त्यावेळी समाधीवर आजच्यासारखा मुखवटा नव्हता. मूळ समाधी होती. त्यावेळी दीदींच्या मनात येई की इथे या समाधीखाली ज्ञानेश्वर माऊलींचे वास्तव्य आहे. त्यांचे अस्तित्व त्यांना उत्कटपणे जाणवत असे. त्या तेथील पुजाऱ्यांना म्हणत, मला एका कोपऱ्यात शांतपणे बसू द्या. मंदिरात एका कोपऱ्यात त्या निवांत बसून राहत. त्यावेळी त्यांना खूप आंतरिक समाधान वाटत असे. कसला तरी आधार आपल्याला मिळतो आहे अशी आतून प्रचिती त्यांना येत असे. हीच एकरूपता, हेच आंतरिक समाधान त्यांनी माऊलींचे अभंग जेव्हा गायले तेव्हा त्यांना अनुभवण्यास मिळाली. आळंदीला कधीही आले तर त्यांच्या मनाला मुक्त, निर्भर आनंद मिळत असे. पण पुढे पुढे आळंदीला गर्दी होऊ लागली, त्यांना हवी असलेली शांतता मिळेनाशी झाली. दुकाने, गजबजाट वाढू लागला. माणसे त्यांच्याभोवती गर्दी करू लागली. तेव्हापासून त्यांनी आळंदीला जाणे कमी केले.

दीदींना कधी कधी आपल्या दैनंदिन जीवनाचा कंटाळा आला की सरळ पन्हाळा किंवा त्यांच्या आवडीचे एखादे निसर्गरम्य ठिकाण गाठत. अशा वेळी त्या निर्माते, संगीतकार कोणालाही आपला पत्ता लागू देत नसत. तेथे त्यांच्या मनाला अपार शांतता मिळत असे. पण आता आळंदीसारखीच स्थिती या किल्ल्यांवर झाली आहे. तेथील शांतता, पावित्र्य नष्ट होत चालले आहे. तेथे होणाऱ्या पार्ट्या, नाचगाणी इ मुळे निर्माण झालेल्या घाणेरड्या वातावरणामुळे दीदी आता व्यथित होतात.

दीदींना भेटण्यासाठी नेहमी वेगवेगळे लोक येतात. त्यांच्या भेटीला कुणी बंगाली माणूस आला की त्यांचे त्या माणसाशी सुरुवातीला अस्खलित बंगालीत पंधरावीस मिनिटे बोलणे सुरु राहते. कि खोबोर दादा ? तो माणूस आश्चर्यचकित होतो. कोणी पंजाबी व्यक्ती आली की ससरी गल महाराज आणि उर्दूबद्दल तर काही बोलायलाच नको. उर्दूचे प्रसिद्ध शायर मजरुह सुलतानपुरी तर म्हणतात, हमारे गीतोमे सिर्फ लताजी ही कुछ फर्क कर सकती हैं एवढे त्यांचे विविध भाषांवर प्रभुत्व आहे.

(क्रमशः)







उज्वला धर्माधिकारी,
पुणे, मो. ७५८८२ ३५६४६

# साधकनिरूपण

ज्योतिर्मय साहित्य

नमस्कार,
साधक कुणाला म्हणतात ?
संतसंगतीने प्रथम आत्मज्ञानाचे ध्येय प्राप्त होते. संतांच्या विचारांचा प्रभाव तुमच्यावर एवढा पडतो की तुम्हाला ध्येय गाठण्याचा मार्ग सहज सापडतो. आठव्या मुमुक्षु समासात तर आपण पाहिले आहे की मुमुक्षलक्षण हे संतसंगतीवर आधारलेले आहे. प्रापंचिक दु:खांचा चटका बसून संसाराची अपूर्णता जाणवली की मुमुक्षलक्षणास आरंभ होतो. आपण कुठेतरी अपूर्ण आहोत याची जाणीव होते. आपल्यातले दोष दिसु लागतात, प्रपंचाचा डोलारा कुचकामी वाटू लागतो. संतसंगतीची ओढ वाटू लागते.त्यांना साधक म्हणतात. साधकाने संताच्या जवळ किंवा सानिध्यात राहून ‘‘अनुसंधानाची‘‘ विद्या शिकायची असते. ‘‘मी देहच आहे या भावनेत रहाणारा साधक ‘‘मी आत्माच आहे‘‘ या भावनेत रहाण्याचा अभ्यास करत रहातो. देहाचे अनुसंधान बाजूला सारून आत्मस्वरूपाचे अनुसंधान ठेवायची युक्ती साधणे हे साधकाच्या साधनेचे फलीत होय. साधकाची साधना योग्य रूपाने चालू आहे.
साधकाची साधना योग्य रितीने चालु आहे हे समजते. सात्विकतेच्या आहार, विहार व विवेचनात समजेली साधकता व सात्विकतेच्या मार्गावरून जाते. जुने आचारविचार बदलून नवीन स्वस्वरूपांत आचारविचारांवर अखंड धारणा धरावी लागते.देहावर व द्रुश्यावर सहजपणे रहाणारे मन सततच्या अभ्यासाने आत्म्यापाशी किंवा स्वस्वरूपापाशी ठेवण्यात अखंड धारणा धरावी लागते. सैरावैरा धावणाऱ्या मनाला व इंद्रियामध्यें पसरलेल्या मनाला स्वैर वागु दिले जात नाही. ज्याला ही साधन साधते तो साधक होय. (क्रमशः)

## संतांनी लिहिलेले ग्रंथ हे त्यांच्या मृत्युपत्रासारखे आहेत



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

ज्योतिर्मय साहित्य

संतांना ग्रंथ लिहिण्याची मुळीच हौस नसते, नाइलाज म्हणून ते ग्रंथ लिहीत असतात. तुम्हाला असे वाटते का, की नाथांनी आणि समर्थांनी ज्ञानेश्वरीची पारायणे करून नंतर आपले ग्रंथ लिहिले ? त्यांचे ज्ञान स्वतंत्र असते, आणि ते साक्षात् भगवंतापासून आलेले असते. त्यामधे अर्थात् मागील ग्रंथकारांनी सांगितलेल्या काही गोष्टी येणारच.
संतांनी लिहिलेले ग्रंथ हे त्यांच्या मृत्युपत्रासारखे आहेत. आपले मुलगे चांगले वागतील अशी ज्या बापाला खात्री वाटते तो कशाला मृत्युपत्र लिहील ? तशी ज्याला खात्री नसते तो नाइलाजाने मृत्युपत्र लिहितो ! त्याचप्रमाणे, संतांनी हौसेने किंवा विद्वता दाखविण्यासाठी ग्रंथ लिहिले नाहीत, तर आपल्यासारख्या जडजीवांचे कल्याण व्हावे ही तळमळ त्यांना होती म्हणून त्यांनी ग्रंथ लिहिले. पोथी, पुराणे, सत्पुरुषांचे ग्रंथ, यांचा आपल्या जीवनाशी निकट संबंध असतो. असल्या ग्रंथांमध्ये, ज्याचा व्यवहारामध्ये उपयोग करता येतो असा वेदान्त सांगितलेला असतो. आपल्याला सुचणार नाहीत इतक्या शंका समर्थांनी घेऊन त्यांची उत्तरे दासबोधात दिली आहेत. परमार्थ न ऐकणारा दोषी आहे, पण तो ऐकत नसताना त्याला सांगणारा त्याहूनही दोषी समजावा. हा दोष पत्करूनही संत जगाला परमार्थ सांगत असतात, त्याचा फायदा करून घ्यावा.
ग्रंथ वाचीत असताना, ध्येय जर परमार्थप्राप्ती हे असेल तर त्यासाठी त्या ग्रंथात साधन कोणते सांगितले असेल इकडे लक्ष असावे. साधनाची योग्य निवड झाली की साध्य साधेलच. ज्या विषयात पारंगत व्हायचे तीच पुस्तके वाचणे जरूर असते. आमचे उलट होते; गणित विषय घेतो आणि वाचतो कादंबऱ्या ! मग गणितात पास कसे होणार ? परमार्थ हेच जर ध्येय असेल तर संतांच्या ग्रंथांचाच अभ्यास करावा, त्यांचेच श्रवण-मनन करावे.
आपण आपले मन भगवंताच्या चरणावर चिकटवून ठेवावे, आणि देह प्रारब्धाच्या प्रवाहामध्ये सोडून द्यावा. कधी तो सुखात राहील, तर कधी तो दु:खात राहील; कधी तो बरेच दिवस सरळ जाईल, तर कधी तो मधेच गचका खाऊन बुडायच्या बेताला येईल; पण त्याच्या कोणत्याही अवस्थेमधे आपला आनंद कायम टिकेल यात शंका नाही. आपल्या देहाकडे आपण वेगळेपणाने पहायला शिकले पाहिजे. मन द्यावे भगवंताला आणि देह द्यावा प्रारब्धाला, म्हणजे हे साधेल. देहाचे सुखदु:ख वरवरचे असावे, ते आत शिरून मनावर परिणाम करता कामा नये. भगवंताच्या नामाने हे हमखास साधते. म्हणून अखेर नामाशिवाय गत्यंतर नाही.
संतांच्या ग्रंथाचा खरा अर्थ कृतीनेच कळेल.

## ॥ संत महात्म्य ॥

लेखक - मधुकर बोरीकर
9403061886

## श्री ज्ञानेश्वरी निर्मितीचे प्रयोजन कोणते?

ज्योतिर्मय साहित्य

असे सदबुद्धी असलेले सिद्ध पुरुष अनेको अनेक निर्माण व्हावेत. त्यांच्या प्रभावातून दृष्टांचा दुष्टपणा कमी व्हावा सर्व भूतमात्रात परस्परात स्नेह निर्माण व्हावा. ही मंगल कामना आणि तशी आग्रही मागणी भगवान श्री ज्ञानेश्वर महाराज यांनी आपली अनंत जन्माची तपसाधनेचे तेज पणाला लावून हे पसायदान मागून घेतलेले आहे. असे सुबुद्धी असलेले म्हणजेच बुद्धी योगी सिद्धपुरुष निर्माण होण्यासाठी त्यांना सिद्ध करून घेणारे, समर्थ सद्गुरु तितक्याच मोठ्या प्रमाणावर लागणार आहेत, म्हणून भगवंताला त्यांनी अशा सिद्ध पुरुषांचे जथेच्या जथे लोककल्याणासाठी आणि बुद्धी योगी सिद्ध पुरुष घडविण्यासाठी जनसामान्यात पाठवावेत ही आग्रहाची विनंती केली आहे. आणि तसा आदेश या महारावानी म्हणजेच ज्ञानेश्वर महाराजांनी इतर सिद्धांना दिला आहे. असे सिद्ध पुरुष निर्माण झाल्यानंतर त्यांच्या प्रभावाने राग द्वेष मोह अभिनिवेष हे क्लेश क्षिण होतील. आणि समाज सत्वगुण प्रधान व्हायला मदत होईल. म्हणजेच पर्यायाने या समाजाचे अध:पतनापासून रक्षण होईल.
आता आपणास कळाले असेल की ज्ञानेश्वर महाराज यांनी ही ज्ञानेश्वरी या जगताचे अध्यपतनापासून कसे रक्षण करील याचा वस्तू पाठ या ग्रंथातून दिला आहे.यात अनेक दिव्य प्रयोग दिले आहेत. साधकांनी ते प्रयोग स्वतःची पात्रता वाढवून आणि श्री गुरुच्या कृपेने मिळवायचे असतात. आणि पूर्णत्वास न्यायचे असतात.
अशा रीतीने ज्ञानेश्वरी हा ग्रंथ निश्चितच या कलि युगाला अध:पतनापासून वाचविणारा महान ठेवा आहे. यात किंचितही शंका नाही.
सिद्ध पुरुषांचे सामर्थ्य कसे असते हे जाणण्यासाठी नुकतेच आळंदी येथे केलेला एक प्रयोग लक्षात घेण्यासारखा आहे.
काही लोकांना असे अनुभवास आले की ज्ञानेश्वर माऊलीची समाधी असणाऱ्या आळंदीच्या परिसरात कितीही लोक येवोत त्यांच्यात सद्भाव, भक्ती जागृत होते. विकारांना थोडासा लगाम लागतो. हे याच क्षेत्रात आल्यावर कसे काय घडते ?हा प्रश्न पडला. काही लोकांनी वैज्ञानिक प्रयोग करून पहावे म्हणून अल्फा रेज चा संदेश टिपणारे उपकरण आणले आणि त्यांच्या हे लक्षात आले की, माऊली च्या समाधी स्थानापासून दहा किलोमीटर वर हवेत आणि २२ किलोमीटर रुंद परिसरात सर्वत्र अल्फा रे चा प्रभाव दिसून आला.
समाधी अवस्थेत जेव्हा योगी असतो ,तेव्हा ही दिव्य किरणे त्याच्या मस्तकातून बाहेर प्रस्फुटीत होत असतात,
आणि त्यांच्या संपर्कात जो कोणी येईल, त्याचा रजो गुण आणि तमोगुण कमी होऊन, सत्वगुण प्रभावशाली होऊ लागतो.
माऊली समाधीस्थ होऊन आज साडेसातशे वर्षे झाली. आजही इतक्या प्रचंड प्रमाणात अल्फा रे चा वर्षाव समाधी स्थानातून बाहेर पडतो आहे. तर ज्यावेळेस माऊली प्रत्यक्ष देहानीशी हजर होते, त्यावेळेस त्यांचा प्रभाव किती दूरपर्यंत जात असेल?ज्ञानेश्वरीत दिलेले दिव्य प्रयोग हे गुरूच्या मुखातून त्यांच्या आज्ञेने प्रत्येकाने कसोशीने करावेत व स्वतः विकसित होण्या सोबतच अवती भवतीचा संपूर्ण परिसर सत्व गुण प्रधान करून या देशाला सुजलाम सुफलाम करण्याकडे वळावे ही इच्छा व्यक्त करून हा भाग इथेच संपवितो.

****

## ॥ निरूपण ॥



ह.भ.प. चंद्रहास शास्त्री सोनपेठकर

ज्योतिर्मय साहित्य

जन्ममरणचक्रस्य जायते भेदनं यया।
प्रदक्षिणां करोमीति देहस्य साधनेन वै।।१००।।
जन्म मरण चक्राचे भेदन जिच्यामुळे घडते, अशी तुझी प्रदक्षिणा मी देहाच्या साधनाने करतो.
एतां मानसपूजां मातुश्चरणयोः समर्प्याहम्।
मुदितश्चन्द्रहासोऽत्र रेणुके भजनेन ते।।१०१।।
ही मानसपूजा मातेच्या चरणी समर्पित करून हे रेणुके, तव भजनाने मी चंद्रहास आनंदित झालो.
अथ श्रीदेवीनमनम्।
शिवे रेणुके रेणुकन्ये नमस्ते
नमस्ते सुधीरे सुरैर्वन्दितेऽम्बे।
सदा मे समीपे वसन्ती हसन्ती
नमस्तेस्तु दुर्गे सुरैः पूजिताद्ये।। १०२।।
हे शिवे, रेणुके, रेणुकन्ये, सुधीरे, सुरवंदिते, माते, तुला नमस्कार असो. तुला नमस्कार असो. हे सुरांद्वारे आद्यपूजित दुर्गे, तू सदैव माझ्या जवळ राहतेस, स्मित हास्य करतेस.



## आरोग्य संजीवनी

# जखम झाल्यावर धनुर्वात प्रतिबंधक लस का देतात?

ज्योतिर्मय साहित्य

जखम झाल्यावर धनुर्वात होऊ नये, यासाठी सर्वच डॉक्टर धनुर्वात प्रतिबंधक लसीचे इंजेक्शन देतात.
टिटॅनस टॉक्साईड व टीटीचे इंजेक्शन का देतात, असा प्रश्न पडणे स्वाभाविकच आहे. जखम झाल्यानंतर त्यात रस्त्यावरची, घरातील, शेतातील माती वा इतर घाण जाऊ शकते.
धनुर्वाताच्या जिवाणूच्या बीजावस्था (स्पोर) असतात. हे जंतू विपरीत अवस्थेत जिवंत राहण्यासाठी बीजावस्थेत जातात या अवस्थेत ते उष्णता, कोरडेपणा यांना सहजगत्या तोंड देऊ शकतात. सुयोग्य वातावरण मिळाल्यास या बीजावस्थाचे रूपांतर धनुर्वाताच्या जंतूमध्ये होते.
हे जंतू मग एक भयंकर विष निर्माण करतात. या विषाचा परिणाम मेंदूवर व स्नायूवर होतो. यामुळे धनुर्वात या रोगात स्नायू कडक होणे, शरीराची कमान होणे, दातखीळ बसणे, झटके येणे अशा गोष्टी पाहावयास मिळतात.
या आजारात मृत्यूचे प्रमाण जरी आता खूप कमी झाले असले तरी, नवजात बालकांमध्ये मात्र मृत्यूचे प्रमाण ८० टक्के इतके आहे.
धनुर्वात होऊ नये, यावर एकमेव खात्रीलायक इलाज म्हणजे धनुर्वाताची लक्षणे ज्या विषामुळे दिसतात त्या विषाचा बीमोड करण्यासाठी प्रतिबंधक लस घेणे.
ही लस घेतल्यानंतर सुमारे २१ ते ३० दिवसांत आपल्या रक्तात धनुर्वाताच्या जंतूच्या विषाविरुद्ध कार्य करणारे प्रतिद्रव्य तयार होते. त्यामुळे धनुर्वात होणे टाळता येते.


संकलन -
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क - ९२ ७१ ६६९ ६६९

येथे एक महत्त्वाची गोष्ट लक्षात घेणे आवश्यक आहे: ती म्हणजे, आज घेतलेल्या लसीचा उपयोग महिन्या भरानंतर होतो. धनुर्वाताचा अधिशयन काल काही दिवसांचाही असू शकतो.
साहजिकच जखम झाल्यावर घेतलेल्या टीटीच्या लसीमुळे, त्या जखमेमुळे धनुर्वात होणार असेल तर फारसा उपयोग होत नाही. यासाठी काय करावे ?
लहान मुलांना दीड महिन्यापासून त्रिगुणीच्या लसी द्याव्या. एखाद्याने कोणतीच लस घेतली नसेल, तर महिन्याच्या अंतराने टीटीची दोन इंजेक्शने द्यावी. त्यामुळे त्याला धनुर्वातापासून ५ वर्षे संरक्षण मिळेल.
नंतर दर ५ ते १० वर्षांनी एक इंजेक्शन घ्यावे. अशा प्रकारे आपण केव्हाही होणाऱ्या जखमांपासून उद्भवू शकणाऱ्या धनुर्वाताचा प्रतिबंध करू शकतो.
शस्त्रक्रिया करण्यापूर्वी (शक्य असेल तेव्हा) बाळंतपणाच्या अपेक्षित तारखेच्या आधी सुमारे महिनाभर यासाठीच टीटीचे इंजेक्शन घेणे गरजेचे असते.

**डॉ. अंजली दिक्षित व डॉ. जगन्नाथ दिक्षित यांच्या पुस्तकातुन**

****

## ॥ श्री राम कथा ॥





वक्ते : आदरणीय श्री चैतन्य महाराज देगलूरकर

ज्योतिर्मय साहित्य

राम रावणाचे युद्ध बराच काळ चालले. त्या आधी अगस्त्य ऋषी आले त्यांनी आदित्य ऋदय स्तोत्राचा पाठ करण्यास सांगितले.
शेवटी रावण मारला गेला.बिभीषणास भाऊ मेल्याचे दुःख झाले.नंतर बिभीषणास राज्याभिषेक करण्याचे ठरले.रावण हा रामाच्या हाताने मेला असल्या मुले तो मोक्ष पावला होता.म्हणून त्याचा दाह संस्कार केला.

कथा ऐकता ऐकता धावते संकलन
मधुकर बोरीकर, 9403061886

हनुमान सीतेला भेटले व चला म्हणाले सीता म्हणाली रामांनी येऊन मला न्यावे.
वाल्मीक रामायणात एक गोष्ट आहे तिथे रामांनी सीतेच्या चरित्रावर संशय घेतला.तसा संशय अनेक वानरांचे मनात होता.मग अग्नी दिव्य केले.राम सिता मातेस घेऊन अलीकडील समुद्र किनाऱ्यावर आले.
राम रावणाचे युद्ध कसे झाले ?तर राम रावण युद्ध सारखे.समुद्र कसा आहे तर समुद्रा सारखा.यास अन्य उपमा नसते.
वानर म्हणे ज्या सीता माते साठी हे भीषण युद्ध केले ती कशी दिसते? मग हनुमानाने योजना केली राम व सिता मातेस दगडावर बसविले व सर्व वानरांना दर्शनासाठी रांग लावण्यास सांगितले.सर्व वानर रांगेने येत दोघांचे दर्शन घेत.व सीता सुंदर नाही म्हणून नाक मुरडत होते. याचे कारण काय ?तर म्हणे हिला शेपटीच नाही. सौंदर्याच्या व्याख्या ज्याच्या त्याच्या निराळ्या असतात. (क्रमशः)

# २ ऑक्टोबर गांधी जयंती विशेष

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

गांधीजी हे केवळ स्वातंत्र्य संग्रामाचे नेते, विचारवंत, तत्वज्ञ आणि महान लेखकही होते. त्यांच्या जीवनशैलीने आणि विचारसरणीने राजकारणावर नव्हे तर साहित्य, समाज आणि संस्कृतीवरही खोलवर प्रभाव टाकला आहे. भारतीय साहित्यावर त्यांचा खोलवर परिणाम झाला. स्वातंत्र्यलढ्याच्या काळात आणि नंतरही अनेक लेखक, कवी, नाटककार आणि कादंबरीकारांनी गांधीजींच्या विचारांना प्रेरणास्थान मानले. आजच्या विशेषतः भारतीय व जागतिक साहित्यात गांधीविचारांची गरज अधिक तीव्रतेने जाणवत आहे. सामाजिक ऐक्यसाठी गांधीविचारांची आजच्या पिढीला गरज आहे. गांधीजींनी धार्मिक, जातीय सलोखा यावर भर दिला. आज ज्या पद्धतीने साहित्य जात, धर्माच्या आधारे विभागले जात आहे, तिथे गांधीविचार एकत्रित करणारा दुवा ठरू शकतो. सत्य आणि नैतिकता सोशल मीडियाच्या काळात जिथे खोट्या बातम्या आणि द्वेषमूलक पसरतो, तिथे गांधीजींचे सत्याग्रह आणि स्वत:च्या दोषांवर प्रहार हे विचार साहित्यिकांना दिशा देऊ शकतात. साधेपणा आणि पर्यावरण आजच्या भोगवादी जीवनशैलीतून बाहेर पडण्यासाठी गांधीजींच्या स्वावलंबन आणि साधे जीवन या तत्त्वांची आठवण होणे आवश्यक आहे. आजचे साहित्य अनेकदा वैयक्तिक भावनांभोवती फिरते. आत्मशोध, संघर्ष, सामाजिक अन्याय, राजकारण, लैंगिकता या विषयांवर भर असतो. ही विषयं नक्कीच महत्त्वाची आहेत, पण या



लेखनात अनेकदा सत्य आणि अहिंसा अशा मूल्यांचा अभाव दिसतो. साहित्य समाजाचा आरसा असतो, पण आजचा आरसा अनेकदा अंधाराने झाकोळलेला वाटतो.

स्वातंत्र्य लढ्याच्या काळात आणि नंतरही अनेक लेखक, कवी, नाटककार आणि कादंबरीकारांनी गांधीजींच्या विचारांना प्रेरणास्थान मानले. गांधीजींच्या सत्य आणि अहिंसा या मूलभूत तत्त्वांनी भारतीय साहित्याला नवीन दिशा दिली. त्यांनी साधेपणा, ग्रामीण जीवन, आत्मनिर्भरता, खादीचा प्रचार, अस्पृश्यता निवारण, स्त्री-पुरुष समानता यांसारख्या सामाजिक विषयांना प्राधान्य दिले. हेच विषय अनेक साहित्यिकांनी आपल्या लेखनातून मांडले. वि. स. खांडेकर, साने गुरुजी, ग. दि. माडगूळकर, आणि शिवाजी सावंत यांसारख्या लेखकांनी गांधी विचारसरणीचा प्रभाव स्पष्टपणे दाखवून दिला आहे. साने गुरुजींच्या श्यामची आई या आत्मकथनपर पुस्तकात गांधीजींच्या संस्कारांचा ठसा जाणवतो त्यात मातृत्व, सदाचार, कर्तव्यनिष्ठा यांचा आदर्श आहे, जो गांधीजींनी आपल्या जीवनात जपला होता.



प्रा. डॉ. कैलास आतकरे,
छत्रपती संभाजीनगर.
मो. 98508 70150

प्रेमचंद यांच्या कादंबऱ्यांतून गरीब, शोषित, शेतकरी वर्गाचे दु:ख आणि गांधीजींच्या विचारांची प्रेरणा दिसून येते. गोदान कादंबरीतून त्यांनी सामाजिक विषमता आणि ग्रामीण जीवनाचे वास्तव दाखवले आहे. टागोर आणि गांधीजींमधील वैचारिक मतभेद असूनही, टागोरांच्या लेखनात मानवी मूल्यांचा गौरव दिसतो. गांधीजींचा प्रभाव कन्नड, तेलुगू, तमिळ आदी भाषांतील साहित्यातही दिसून येतो.

नाट्य आणि कविता क्षेत्रातही गांधी विचारांचा प्रभाव प्रकर्षाने जाणवतो. कवी यांनी स्वातंत्र्य, त्याग, आत्मशुद्धी, आणि सत्यासाठी झगडणाऱ्या सामान्य माणसाचे चित्रण केले. ग. दि. माडगूळकरांनी लिहिलेली अनेक राष्ट्रप्रेमाची गीते ही गांधीजींच्या विचारांची साहित्यिक अभिव्यक्ती आहेत. गांधी विचारांनी भारतीय साहित्यातील कलात्मकता आणि सामाजिक जाणीव यांचे सुंदर संमीलन घडवून आणले. गांधीजींनी जसे समाज परिवर्तनासाठी लेखनाचा उपयोग केला, तसेच अनेक लेखकांनी साहित्याच्या माध्यमातून जनजागृती केली.

गांधी यांचे विचार भारतीय साहित्याच्या नसानसांत भिनलेले आहेत. त्यांच्या तत्वज्ञानामुळे साहित्य अधिक मानवीय, नैतिक आणि सामाजिकदृष्ट्या जागृत झाले. आजही त्यांच्या विचारांचे प्रतिबिंब आधुनिक साहित्यात दिसते, यावरून त्यांच्या प्रभावाची व्यापकता आणि कालातीतता सिद्ध होते.



# डॉ. अनुपम टाकळकर यांच्या नेतृत्वाखाली आरोग्य शिबिर व धान्य वाटप

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

**छत्रपती संभाजीनगर –** इंडियन मेडिकल असोसिएशन, छत्रपती संभाजीनगर तर्फे पैठणजवळील पूरग्रस्त भागात आरोग्य तपासणी शिबिर व धान्य वाटपाचे आयोजन करण्यात आले. पूरामुळे अडचणीत सापडलेल्या कुटुंबांना मदतीचा हात देण्याच्या उद्देशाने ही उपक्रम राबविण्यात आला.

एकूण ११० धान्य पाकिटांचे वाटप करण्यात आले. प्रत्येक पाकिटामध्ये १ किलो गव्हाचे पीठ, १ किलो तांदूळ, तूर डाळ, साखर व बिस्किटांचा एक पुडा असा समावेश करण्यात आला. या माध्यमातून कुटुंबांना तात्काळ अन्नधान्याची मदत मिळाली.

पूरस्थितीनंतर निर्माण होणाऱ्या संसर्गजन्य व त्वचारोगांसह इतर आजारांवर वैद्यकीय सेवा उपलब्ध करून देण्यासाठी आरोग्य तपासणी शिबिर घेण्यात आले. रुग्णांची तपासणी करून आवश्यक मार्गदर्शन व औषधे देण्यात आली.

''पूराच्या या आपत्तीत समाजाच्या सोबत उभे राहणे हीच आपली सर्वात मोठी जबाबदारी आहे. आरोग्य सेवा आणि धान्य वितरणाच्या माध्यमातून आयएमएचे उद्दिष्ट पूरग्रस्तांना दिलासा देणे आणि ते एकटे नाहीत, आम्ही त्यांच्या सोबत आहोत हा संदेश त्यांना देणे हा होय'' असे यावेळी डॉ. अनुपम टाकळकर यांनी सांगितले.

या तपासणी शिबिरात डॉ. अनुपम टाकळकर, डॉ. योगेश लक्कस, डॉ. शहाजी तौर, डॉ. निशा तौर, डॉ. राघवेंद्र चाकूरकर, डॉ. उर्मिला चाकूरकर सहभागी झाले होते.


आयएमए छत्रपती संभाजीनगर शाखा नेहमीच सामाजिक कार्यात व आरोग्य सेवेत अग्रेसर राहिली आहे. संकट काळात समाजाच्या सोबत उभे राहण्याची परंपरा या उपक्रमातून पुन्हा अधोरेखित झाली.

साहित्यिक मित्रांनो,
आता लिहा बिनधास्त कारण आता तुमच्या साहित्याला प्रकाशित करण्यासाठी आले आहे एक भव्य व्यासपीठ
ज्योतिर्मय
साहित्याचे विद्यापीठ
"ज्योतिर्मय" साहित्याचे विद्यापीठ.
साहित्यावरील प्रत्येक घटना, कथा, कविता, लेख, परीक्षण, पुरस्कार, संमेलन प्रत्येकाची नोंद आम्ही घेणार, मग विचार कसला करता!
हो जाओ शुरु....
या व्यासपीठावर तुमचे सर्वांचे स्वागत आहे.
- संजय व्यापारी, संपादक 7743918559
ज्योतिर्मय-साहित्याचे विद्यापीठ

# भारत मातेचे थोर सुपुत्र ; लाल बहादूर शास्त्री

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

भारत मातेचे थोर सुपुत्र, देशाचे दुसरे पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांची आज जयंती आहे. लालबहादूर शास्त्री यांचे पूर्ण नाव लालबहादूर शारदाप्रसाद वर्मा असे होते. पण १९२५ साली बनारस येथील काशी विद्यापीठाची शास्त्री ही पदवी लालबहादूर यांनी मिळवली त्यामुळे त्यांना सर्वजण शास्त्री म्हणू लागले पुढे त्यांनी आपल्या नावापुढे शास्त्री हेच नाव लावले आणि ते लालबहादूर वर्माचे लालबहादूर शास्त्री बनले. त्यांचा जन्म २ऑक्टोबर १९०४ रोजी उत्तर प्रदेशातील मोगल सराई या गावात झाला. लालबहादूर शास्त्री दीड वर्षाचे असतानाच त्यांच्या वडिलांचे निधन झाले. त्यांच्या आईनेच त्यांचा सांभाळ केला. लालबहादूर शास्त्री यांचे बालपण गरिबीतच गेले. घरची हलाखीची परिस्थिती असूनही लालबहादूर यांनी आपले शिक्षण पूर्ण केले. शालेय वयातच लाला लजपतरायांनी स्थापन केलेल्या द सर्व्हन्ट ऑफ द पीपल सोसायटीचे सदस्यत्व त्यांनी घेतले. महात्मा गांधींच्या विचाराने ते प्रभावित झाले होते. गांधीजींच्या असहकार चळवळीत त्यांनी भाग घेतला. गांधीजींसोबत दांडी यात्रेतही त्यांनी भाग घेतला होता. १९३९ साली त्यांची पंडित नेहरूंशी भेट झाली आणि



ते स्वातंत्र्य चळवळीत सहभागी झाले. देश स्वतंत्र झाल्यावर पंडित नेहरुंच्या पहिल्या मंत्रिमंडळात त्यांनी रेल्वे व वाहतूक, दळणवळण, वाणिज्य व उद्योग आणि गृहमंत्रीपद भूषविले. ते रेल्वेमंत्री

**श्याम बसप्पा ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

असताना एकदा रेल्वेचा अपघात झाला होता त्यात काही प्रवाशांना स्वत:चा जीव गमवावा लागला होता या अपघाताची नैतिक जबाबदारी स्वीकारुन त्यांनी रेल्वेमंत्रीपदाचा राजीनामा दिला होता. देश आणि संसदेने त्यांच्या या अभूतपूर्व निर्णयाची प्रशंसा केली होती. तत्कालीन पंतप्रधान पंडित नेहरू यांनीही त्यांच्या या इनामदार वृत्ती आणि आदर्श मूल्यांची संसदेत प्रशंसा केली होती. पंडित नेहरुंच्या आकस्मिक निधनानंतर देशाची धुरा त्यांच्याकडे आली. ९ जानेवारी १९६४ रोजी देशाचे दुसरे पंतप्रधान म्हणून त्यांनी शपथ घेतली. शपथ घेतल्यानंतर अल्पावधीतच त्यांनी आपल्या कर्तुत्ववाने पंतप्रधानपदावर ठसा उमटविला. प्रखर राष्ट्रवादी असलेल्या शास्त्रीजींनी आपल्या पंतप्रधान कालावधीत देशहिताचे अनेक निर्णय घेतले. १९६५ साली पाकिस्तानने आगळीक करुन भारताशी युद्ध पुकारले. पण देशात लालबहादूर शास्त्री यांच्यासारखे खंबीर नेतृत्व असल्याने पाकिस्तानला माघार घ्यावी लागली. आपल्या कणखर नेतृत्वाने त्यांनी पाकिस्तानला पराभूत केले. या युद्धानंतर त्यांच्या नेतृत्वाने जगातील मातब्बर नेते प्रभावित झाले. जय जवान, जय किसान या त्यांच्या मंत्राने देश भारावून गेला. लालबहादूर शास्त्री हे अवघे १९ महिने पंतप्रधान होते. या १९ महिन्यांच्या कालावधीत जनसामान्यांच्या हृदयात त्यांनी अढळ स्थान मिळवले. ११ जानेवारी १९६६ रोजी त्यांचे निधन झाले. जयंतीदिनी शास्त्रीजींना विनम्र अभिवादन!

सिडको परिसरात लवकरच शुभारंभ....
एक छान लोकेशन जिथे आपण --
▪ बर्थडे पार्टी ▪ रिसेप्शन ▪ किटी पार्टी
▪ कॉन्फरन्स मिटिंग ▪ गेट - टू - गेदर
▪ सांस्कृतिक कार्यक्रम ▪ प्रकाशन समारंभ
▪ डोहाळ जेवण ▪ भिशी पार्टी व इतर...
हे व असे बरेचसे कार्यक्रम करण्यासाठी आम्ही सज्ज आहोत. एसी हॉल, लॉन, गार्डन, केटरिंग व्यवस्था, इव्हेंट मॅनेजमेंट, साउंड सिस्टीम सर्व व्यवस्था एकाच ठिकाणी
विशेष : - प्रसन्न वातावरण - सुलभ पार्किंग व्यवस्था - सौजन्य सेवा - मध्यवर्ती ठिकाण - अगदी किफायतशीर दरात
सिद्धिविनायक
▪ हॉटेल ▪ लॉन ▪ इव्हेंट
संपर्क : 7498560019, 7588803314
Email phulambrikarrajendra@gmail. com

# स्वराज्याचा हुंकार - 'पुन्हा शिवाजीराजे भोसले' ३१ ऑक्टोबरला होणार प्रदर्शित

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

''स्वराज्याचं रक्षण करायला राजे पुन्हा येत आहेत !'' या दमदार घोषणेने महाराष्ट्रात एका विलक्षण चित्रपटाची चाहूल लागली आहे. महेश मांजरेकर लिखित-दिग्दर्शित, 'पुन्हा शिवाजीराजे भोसले' हा चित्रपट येत्या ३१ ऑक्टोबर रोजी प्रदर्शित होणार असल्याची घोषणा करण्यात आली आहे. या चित्रपटाचा टिझर नुकताच एका दिमाखदार सोहळ्यात प्रदर्शित करण्यात आला. आजवर कधीच दिसलं नाही असं छत्रपती शिवाजी महाराजांचं प्रखर रूप यात दिसणार असून मराठीची अस्मिता, बळीराजाच्या आत्महत्येचा मुद्दा, मराठी माणसांचं मुंबईतील स्थान, परप्रांतीयांची मुजोरी अशा अनेक विषयांवर महाराजांचं भाष्य आणि कृती यातून बघायला मिळणार आहे.

या चित्रपटात सिद्धार्थ बोडके छत्रपती शिवाजी महाराजांच्या मुख्य भूमिकेत असून त्यांच्या सोबतीला विक्रम गायकवाड, शशांक शेंडे, मंगेश देसाई, पृथ्वीक प्रताप, रोहित माने, नित्यश्री अशी कलाकारांची तगडी फौज आहे. याशिवाय राष्ट्रीय पुरस्कार विजेते बाल कलाकार त्रिशा ठोसर आणि भार्गव जगताप यांच्याही यात महत्त्वाच्या भूमिका आहेत. चित्रपटाची कथा पटकथा महेश मांजरेकर यांची असून संवादलेखन सिद्धार्थ साळवी यांनी केले आहे. निर्मिती राहुल पुराणिक आणि राहुल सुगंध यांनी केली असून प्रस्तुती झी स्टुडिओजची आहे. हा चित्रपट केवळ ऐतिहासिक व्यक्तिरेखेचा गौरव न करता,




आजच्या महाराष्ट्राशी आणि त्याच्या अनुत्तरित प्रश्नांशी संवाद साधत असल्याचे टीझरवरून कळतेय.

याप्रसंगी बोलताना दिग्दर्शक महेश मांजरेकर म्हणाले की, ''माझ्यासाठी हा चित्रपट म्हणजे आजच्या समाजाशी भिडण्याचा प्रयत्न आहे. शिवाजी महाराजांच्या विचारांनी केवळ स्वराज्य उभं राहिलं नाही, तर एक जनमानस जागृत झाले. आजच्या पिढीपुढे असलेल्या प्रश्नांकडे पाहाताना, त्याच विचारांचा प्रकाश पडद्यावर आणायचा आहे. 'पुन्हा शिवाजीराजे भोसले' हा प्रवास इतिहास सांगणारा असेलच, त्याचबरोबर वर्तमानाला प्रश्न विचारणारा, त्याला जागवणारा आणि दिशा दाखवणारा ठरेल. कलाकार म्हणून मी गप्प बसू शकत नाही आणि हा सिनेमा माझ्या अस्वस्थतेचा, माझ्या जिव्हाळ्याचा आवाज आहे.''

झी स्टुडिओज मराठीचे व्यवसाय प्रमुख बवेश जानवलेकर म्हणाले, ''झी स्टुडिओज आणि महेश मांजरेकर हे समीकरण कायमच यशस्वी राहिलेलं आहे. मराठीसाठी 'पुन्हा शिवाजीराजे भोसले' हा केवळ एक चित्रपट नसून महाराष्ट्राच्या इतिहासाशी आणि संस्कृतीशी पुन्हा नातं जोडणारा प्रवास आहे. या चित्रपटाशी जोडल्या गेल्याचा आम्हाला प्रचंड अभिमान आहे. या चित्रपटातून महाराज बोलणार आहेत, त्यामुळे हा चित्रपट बघण्यासाठी आणि ऐकण्यासाठी नसून जगण्याचा प्रयत्न करण्यास भाग पाडणारा आहे.''

आपल्या भूमिकेविषयी बोलताना सिद्धार्थ बोडके म्हणाले, '' छत्रपती शिवाजी महाराजांची भूमिका साकारणं ही एक मोठी जबाबदारी आहे आणि ही जबाबदारी मी पार पाडू शकेन, असा विश्वास महेश सरांनी माझ्यावर दाखवला, यासाठी मी मनापासून कृतज्ञ आहे. प्रत्येक भूमिकेसाठी आपण अभ्यास करतोच, परंतु या चित्रपटातील माझा प्रवास विशेष होता. यात दाखवलेले शिवाजी महाराज हे प्रचंड संतप्त आहेत. कारण आज आपल्या महाराष्ट्राची, मराठी माणसाची जी स्थिती आहे ती पाहून कोणाच्याही मनात राग निर्माण होईल. हे वास्तव जेव्हा या चित्रपटाच्या माध्यमातून माझ्या समोर आलं, तेव्हा मी अस्वस्थ झालो, जर आज महाराजांनी ही परिस्थिती पाहिली असती, तर त्यांची भूमिका काय असती? हाच भाव मी या चित्रपटातील माझ्या अभिनयातून प्रामाणिकपणे मांडण्याचा प्रयत्न केला आहे.''

या चित्रपटाची प्रतीक्षा प्रेक्षक आता उत्सुकतेने करत असून, पहिली झलक पाहून हा चित्रपट वर्षातील सर्वात चर्चेचा ठरणार आहे, हे स्पष्ट झालं आहे. द ग्रेट मराठा एंटरटेनमेंट, सत्य सई फिल्म्स आणि क्रिझोल्ह निर्मित महेश मांजरेकर लिखित-दिग्दर्शित 'पुन्हा शिवाजीराजे भोसले' हा चित्रपट ३१ ऑक्टोबर रोजी झी स्टुडिओजच्या माध्यमातून प्रेक्षकांच्या भेटीस येणार आहे.

ऑनलाईन औषधोपचार
आता सर्वकाही झाले आहे ऑनलाईन मग आजारपणात पण घरबसल्या औषधोपचार घ्या, कुठेही जाण्याची गरज नाही, वेळ व पैसा वाचवा 100 % खात्रीशीर इलाज, गुप्तरोग, शारीरिक थकवा, बऱ्याच गोष्टी कोणालाही सांगण्यास लाज वाटते अशा वेळेस फक्त फोनवर तुम्ही तुमचा आजार सांगू शकता व त्यावर आयुर्वेदिक पद्धतीने हमाखास उपाय केला जाईल, पोस्टाने औषधं पाठविल्या जातील, प्रसिद्ध आयुर्वेदाचार्य डॉ. शेख ए एच, 37 वर्षाचा अनुभव, 200 पेक्षा अधिक पुरस्कार प्राप्त, 2 लाखांपेक्षा अधिक विविध लैंगिक समस्यग्रस्त रुग्णांवर यशस्वी उपचार, आतापर्यंत ५ ऑनररी डॉक्टरेटच्या पदव्या देऊन विविध संस्थांनी त्यांना सन्मानित केलेले आहे. त्यांच्या या कार्याची नोंद लंडन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, ओयासिक बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, एशियन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, हुज-हू-इन एशिया रेकॉर्डस् मध्ये विक्रमी नोंद झालेली आहे. सेक्स विषयक कोणताही प्रॉब्लेम असो फक्त एकदा फोन करा व मार्गदर्शन घ्या. व तुमचे प्रश्न सोडवा.
Dr Shaikh A H - 98606 99906



या देवी सर्वभूतेषु शक्ति-रूपेण संस्थिता।
नमस्तस्यै नमस्तस्यै नमस्तस्यै नमो नमः।।



# विजयादशमीचे सिमोल्लंघन.....

**ज्योतिर्मय साहित्य**

दसऱ्याच्या दिवशी रामाने रावणाचा वध केला होता. म्हणूनच एखाद्या चांगल्या गोष्टीची सुरुवात करताना आणि वाईट गोष्टीचा शेवट करण्यासाठी आपण या दिवसाची वाट पाहत असतो. म्हणूनच दसऱ्याला विजयादशमी असंही म्हणतात. हा दिवस म्हणजे विजय मिळवलेला दिवस. या दिवशीच अनेक जण नवीन कार्याची सुरुवात करतात. दसऱ्याला कोणतीही चांगली सुरुवात करायला हवी संकल्प करायला हवे. हिंदू संस्कृतीत खूप महत्व असलेला व मोठा सण दसरा. आश्विन शुद्ध दशमीला येतो. आश्विन महिन्याच्या पहिल्या दिवसापासून नऊ दिवस नवरात्र असते.देवीची शक्तीची उपासना केली जाते. त्यांनंतरचा दहावा दिवस म्हणजेच दसरा, ह्याच सणाला विजयादशमी असेही आपण म्हणतो.

दसरा सण मोठा, नाही आनंदाला तोटा
साधू संत येती घरा,तोची दिवाळी दसरा....

या काव्यातच ह्या सणाची महती गौरवलेली आहे. दसरा हा पराक्रमाचा, पौरुषाचा सण आहे. या दिवशी सरस्वतीपूजन तसेच शस्त्रपूजनही केले जाते.

दसरा या सणाची परंपरा फार पूर्वीपासूनची आहे. याच दिवशी देवीने महिषासुर या राक्षसाचा वध केला. प्रभू रामचंद्र याच दिवशी रावणावर स्वारी करायला निघाले. पांडव अज्ञातवासात राहण्याकरिता ज्या वेळी विराटच्या घरी गेले, त्या वेळी त्यांनी आपली शस्त्रे शमीच्या झाडात लपवून ठेवली होती. अज्ञातवास संपल्यावर त्यांनी तेथील शस्त्रे परत घेतली व त्या झाडाची पूजा केली, तो हाच दिवस.शिवाजी महाराजांनी प्रतापगड किल्ल्यावर भवानी देवीच्या उत्सवाला याच दिवशी सुरुवात केली. पेशवेकाळात ही या सणाचे महत्व मोठे होते. बाजीराव पेशवे याच दिवशी पुढच्या



स्वारीचे बेत आखत. अनेक शूर, पराक्रमी राजे याच दिवशी दुसऱ्या राजावर स्वारी करण्यास जात असत. त्याला सीमोल्लंघन म्हणत. दसरा म्हणजेच विजयादशमी हा साडेतीन मुहूर्तांपैकी एक मुहूर्त आहे. विजयादशमी म्हणजे हमखास विजय मिळवून देणारा दिवस आहे ।





विजयादशमीची कथा अशी सांगितले जाते की--

फार वर्षांपूर्वी वरतंतू नावाचे ऋषी होऊन गेले. त्यांच्याकडे विद्याभ्यासासाठी खूप विद्यार्थी येत. अभ्यास करून मोठे होत. त्या वेळी मानधन किंवा फी नव्हती. त्यामुळे शिक्षण संपल्यावर विद्यार्थी गुरुदक्षिणा देत. या ऋषींकडे कौत्स नावाचा एक शिष्य होता. त्याचे शिक्षण पूर्ण झाल्यावर गुरूंनी त्याला घरी जाण्यास परवानगी दिली. त्याने ऋषींना विचारले कि, ‘‘मी तुम्हाला गुरुदक्षिणा म्हणून काय देऊ ? तुम्ही मागाल ते मी देईन. ‘‘ ऋषींनी कौत्साची परीक्षा घ्यावयाचे ठरविले. त्यांनी कौत्साला प्रत्येक विद्येबद्दल एक कोटी सुवर्णमुद्रा, याप्रमाणे १४ विद्यांबद्दल १४ कोटी सुवर्णमुद्रा आणावयास सांगितल्या.कौत्स हे ऐकून गांगरून गेला. तो रघुराजाकडे गेला. परंतु राजाने त्याच वेळी विश्वजित यज्ञ केल्यामुळे खजिना संपला होता, तरीसुद्धा राजाने कौत्साकडे तीन दिवसांची मुदत मागितली आणि त्याने इंद्रावर स्वारी करण्याचे निश्चित केले. इंद्राला रघुराजाचा पराक्रम माहित होता. त्याने कुबेराला सारी हकीकत सांगितली. इंद्राने आपट्याच्या पानांची, सोन्याची नाणी बनवून, ती पावसासारखी राजाच्या राजवाड्यात पाडली.

कौत्स त्या सुवर्णमुद्रा घेऊन, वरतंतू ऋषींकडे गेला व गुरुदक्षिणा घेण्यास विनंती केली. परंतु ऋषींनी त्यापैकी १४ कोटी सुवर्णमुद्रा परत घेण्यास राजाने नकार दिल्यामुळे कौत्साने त्या मुद्रा आपट्याच्या झाडाखाली ठेवून, लोकांना लुटायला सांगितल्या. लोकानीं त्या वृक्षाची पूजा केली व पाहिजे तेवढ्या मुद्रा लुटल्या. तो दिवस दसऱ्याचा होता. म्हणून त्या दिवसापासून त्या झाडाची पूजा करून सोन्याची पाने लुटण्याची प्रथा सुरु झाली.

*प्रभु रामचंद्रांनी रावणासारख्या बलाढय योध्याचा वध करून शत्रुवर विजय प्राप्त केला तो याच दिवशी.

*देवी दुर्गेने महिषासुर राक्षसाला युध्द करून संपविले ते याच दिवशी. आणि त्यामुळेच तिला महिषासुरमर्दिनी असे म्हंटल्या जाऊ लागले.

या आख्यायिकांचा इतिहास पाठीमागे असल्याने बरेच राजपुत आणि मराठा योध्दे आपल्या युध्द मोहिमांचा याच दिवशी शुभारंभ करीत असत.

अज्ञानावर- ज्ञानाने. वैऱ्यावर- प्रेमाने आणि शत्रुवर- पराक्रमाने मात करुन विजय मिळवण्याचा हा दिवस विजयादशमी अतिशय शुभ समजला जातो.

साडेतिन मुहुर्तांपैकी एक असा हा दिवस कोणत्याही कार्याचा शुभारंभ करण्याकरीता अत्यंत शुभ समजला जातो.अनेक लोक या दिवशी नव्या व्यवसायाला सुरूवात करतात. नवे वाहन, नवीन घर, फ्लॅट, या दिवशी खरेदी करतात वाहनाची पुजा केली जाते.सोने खरेदी करतात.

आपल्या महाराष्ट्रात एकमेकांना सोन्याच्या रूपात आपटयाचे पानं दिली जातात. या दिवशी सिमोल्लंघन, सरस्वती पुजन, शमीपुजन, शस्त्रांचे पुजन आणि अपराजिता पुजन देखील केले जाते.

तिन्ही सांजेला गावाबाहेर जात आपल्या गावाची सीमा ओलांडायची. आपटयाचे आणि शमीचे पुजन करायचे. त्या ठिकाणी अष्टदल रेखाटायचे व त्याच्यावर अपराजिता देवीची स्थापना करायची आणि तीला विजयाकरता वर मागायचा.

शमी शमयते पापम् शमी शत्रुनाशिनी ।
अर्जुनस्य धनुर्धारी रामस्य प्रियदर्शिनी ।।
करिष्यमाणयात्राया यथाकालम सुखम् मया ।
तत्रनिर्वीघ्नकर्त्रीत्वं भव श्रीरामपूजीता ।। हा मंत्र म्हणून शमीच्या झाडाची पूजा करायची
-- तसेच
अश्वंतक महावृक्ष महादोष निवारण ।
इष्टानाम दर्शनम् देही कुरु शत्रुविनाशनम् ।। हा मंत्र म्हणून आपट्याचे पानाचे पूजन करायचे.
अपराजिता पूजन करताना
हरेण तु विचित्रेण भास्वत्कनकमेखला ।
अपराजिता भद्ररता करोतु विजयं मम् ।।
हा मंत्र म्हणतात.

आपटयाच्या झाडाला अश्मंतक आणि वनराज देखील म्हणतात. कफ व पित्त दोषांवर ही पानं गुणकारी समजल्या जातात.

पांडव ज्यावेळी अज्ञातवासात निघुन गेले त्यावेळी त्यांनी त्यांची सर्व शस्त्रं शमीच्या झाडामधे लपवीली होती त्यामुळे विजयादशमीच्या दिवशी शमीची देखील पुजा केली जाते.

एकमेकांमधले परस्परांमधले प्रेम व्यक्त करण्याचा हा शुभदिन दसरा हा असा सण आहे. वर्षातील हाच एकमेव असा दिवस आहे ज्या दिवशी आपण आवर्जून एकमेकांची भेट घेण्याचा प्रयत्न करतो. फेसबूक, व्हाट्सअप, इंस्टाग्राम आदी सोशल मिडीयाच्या माध्यमातुन एकमेकांना शुभेच्छा देतो व सद्भावना व्यक्त करतो.भेटकार्डही दिली जातात. आपट्याची एकमेकांना जुळलेली पाने आपल्याला खूप मोठा संदेश देतात. ते आपण समजून घ्यायला हवे.

‘सीमोल्लंघन’ ही संकल्पना याच दिवशी निर्माण झाली. सीमोल्लंघन करायचे म्हणजे काय करायचे? तर ‘सत’वर विजय मिळवायचा. रावण वध हा प्रतिकात्मकअसेल; पण त्या निमित्ताने ‘असत’चा पराभव करायचा, हे सूत्र,त्यामागील उद्देश आहे.

अजूनही ग्रामीण भागात सिमोलंघना ऐवजी शिलंगण हा शब्द प्रयोग करतात. शिलंगणाचे सोने आणायला चला असे म्हणतात.

समाजजीवनाला एकत्रित ठेवण्याकरिता असे टप्प्याटप्प्यावर आलेले सण विविध नावांनी साजरे करताना त्याच्या विविधतेमधील एकता ही सगळयात मोठी शक्ती मानली गेली आहे. आजच्या सीमोल्लंघनाचा अर्थ पांडव काळातील शस्त्र हाती घेऊन बाहेर पडण्याचा नसून आजच्या समाजजीवनातील विस्कटलेली चौकट पुन्हा सांधण्याचा दिवस म्हणून अशा सणांकडे आजच्या काळात पाहिले पाहिजे.

सोनं घ्या आणि सोन्यासारखे राहा...हा प्रेमाचा आपुलकीचा संदेश देणारा, साडेतीन मुहूर्तांपैकी एक साजरा केला जाणारा दसरा हा सण. या दिवशी समाजातील सर्व नागरिकांनी राग, द्वेष, मतभेद विसरून एकत्र येऊन संस्कृती जपली पाहिजे. राजकीय वैयक्तीक हेवेदावे संपवून विकासासाठी एकत्रित येणे आवश्यक आहे. आजची परिस्थिती बघता, खूपच भयानक आहे.अनेक भागात झालेले बलात्कार,राज्यातले हुंडाबळी, विनयभंग, स्त्री भ्रूण हत्या यासारखे गैरप्रकार समाजात घडताहेत.एकीकडे आपण नऊ दिवस, देवी(स्त्री शक्तीची) ची उपासना करतो. स्त्रीशक्तीचा जागर म्हणतो. निरनिराळ्या क्षेत्रातील महिलांचा सत्कार करतो.।आणि समाजात अशा घटना घडतात.ही समस्त पुरुषांच्या साठी लाजीरवाणी गोष्ट आहे. शस्त्र, वाहन,सरस्वती, या बरोबरच स्त्री जातीचा सन्मान करून आपण सर्वांनी सीमोलल्लंघन करायचा संकल्प करायला हवा आहे.. आपल्या महाराष्ट्रात विजया दशमीच्या दिवशी म्हणजेच दसऱ्याच्या दिवशी अनेक ठिकाणी रावणाचे दहन केले जाते. याच्या मागची कल्पना काय तर दृष्ट बुद्धीचा नाश व्हावा आणि जनतेमध्ये सुख समाधान नांदाव. परंतु आपण वर्षानुवर्ष रावणदहन करत असूनही अद्यापही ते साध्य झालेले नाही. फक्त रावणदहन आपण करीत आहोत.एक इव्हेन्ट म्हणून त्याकडे बघितले जाते.

त्यातून काही साध्य होत आहे का ? समाजातील सर्व घटकांनी याचा विचार करायला हवा आहे. वर्तमान काळातील वाईट वृत्तीचा नाश झाला तरच विजया दशमीला केलेले सीमोल्लंघनाचे सार्थक होईल.....चला तर वाईटाचा शेवट करुन चांगल्या विचारांची सुरुवात करु या. !!

विजया दशमीच्या शुभेच्छा.!

*****

# जागर

**ज्योतिर्मय साहित्य**

नवरात्रीमध्ये नऊ दिवस दुर्गा मातेच्या वेगवेगळ्या नऊ रूपांचा जागर होतो. या काळात सगळीकडे भक्ती, करुणा, उत्साह, भरभरून वाहतो. दुर्गा मातेने दुष्ट महिषासुर राक्षसाचा वध करुन वाईटावर विजय मिळवला होता.तसा आपल्यालाही वाईट विचार, प्रवृत्ती,विकृती वर मात करून विजय मिळवता आला पाहिजे.यासाठी फक्त नऊ दिवस नुसता उपवास करुन चालणार नाही तर ती साधना, उपासना, आत्मशोधाचा प्रवास असावा असे मला वाटते.या निमित्ताने चांगल्या विचारांचा जागर व्हायला हवा.

आजूबाजूला प्रतिकूल परिस्थिती असली तरी आत्म शोधनाची एक अनोखी शक्ती, सदविचारांची ताकद, रस्ता भटकू तर देणार नाही ना, याची आतून जाणीव व्हायला हवी.आपल्याला उमजलेल्या काही चांगल्या गोष्टी आपल्या सानिध्यात येणाऱ्या किमान काही लोकांचा दृष्टिकोन बदलण्यास नक्कीच मदत करतील.वाईट वाटेवर नकळत पाऊले पडत असतील तर योग्य वेळी जीवनाचा काहीसा अर्थ समजून जाईल. किमान काय जगलो त्यातील चुका सुधारून यापेक्षा पुढे कसे चांगले जगता येईल एवढे तरी कळून जाईल. ती व्यक्ती थोडीतरी अंतरंगी डोकावून पाहील.

या काळात दुर्गा मातेची आदिशक्ती, चंडिका, ती अंबिका,महाकाली, अशी कितीतरी रूपात तिची आराधना होते. खरेतर हे स्त्री शक्तीचे रूप दुष्ट राक्षसाचा संहार करण्यासाठी देवीने घेतले होते. म्हणजेच चांगल्याने वाईटावर विजय मिळवण्यासाठी घेतलेले रूप. तसे पाहायला गेले तर आजच्या काळातही अशा अनेक वाईट विकृतींना कोवळ्या वयातील बालकेपासून ते वृद्ध स्त्रीपर्यंत सामना करावा लागतो आहे. बहुतेक वेळेला अशा विकृतींना महिला किंवा



रंजना सानप
मायणी (सातारा)
मोबाईल नंबर -9049548323

मुली सक्षमपणे तोड देण्यापेक्षा पळवाटा शोधतात किंवा घाबरून जातात. मी यावर उघड बोलले तर कुटुंबातील लोक काय म्हणतील? किंवा ही गोष्ट समाजा मध्ये गेली तर बाजू समजून न घेता एक स्त्री म्हणून आपल्यालाच दोषी ठरवले जाईल. आपल्याकडे बघण्याचा समाजाचा दृष्टिकोन बदलेल. अशा कितीतरी भावना मनामध्ये गोंधळ घालत असतात. अति विचाराने अशा मानसिक तणावाखाली जातात.

त्यामुळे आपले काहीच बिघडत नाही अशा समजामध्ये ही विकृती अजून धाडसाने पुढची कृत्य करण्यासाठी सरसावते. पण योग्य वेळीच अशा विकृतींना, प्रवृत्तीला धडा शिकवला तर बदलाचे एक पाऊल नक्कीच पुढे पडेल.

बहुतेक वेळेल वैधव्य आलेल्या किंवा परितक्त्या स्त्रीला समाजात आजही सन्मानाची वागणूक मिळतेच असे होत नाही. आणि या परिस्थितीला पुरुषप्रधान संस्कृती कारणीभूत आहे असे म्हणता येत नाही. कारण काही वेळेला स्त्री स्त्रीचा सन्मान करण्याऐवजी तिचा तिरस्कार करत असते किंवा तिला नाकारत असते. बऱ्याच ठिकाणी मोठ्या व्यासपीठावर स्त्रीत्वाचा जागर होतो. तेवढ्यापुरता तिचा सन्मान केला जातो. अनेक वर्तमानपत्रातून तिच्या सन्मानाच्या बातम्या झळकत असतात. पण ते सारे तेवढ्यापुरतेच असते.

वास्तव जीवनात मात्र परिस्थिती वेगळीच असते.परत आहे तशी हेटाळणी, तिला चारचौघीत सौभाग्याच्या कार्यक्रमात नाकारणे किंवा ती ही एक माणूस असताना तिचं अस्तित्व नाकारलं जातं. मग मग आपणच विचार करावा की हा स्त्रीत्वाचा जागर होतो आहे का? मी एक स्त्री म्हणून दुसऱ्याच्या दुःख वेदना जाणून घेते आहे का? याचा विचार आतून व्हायला हवा. परिस्थितीने दबून खचून गेलेल्या तिला आपण तिच्यातील आत्मबल जागे करूया. तिला थोडाआधार देऊन नव्याने उभे राहण्यासाठी तिच्या पंखात बळ भरुयात. असे झाले तरच तो स्त्रीत्वाचा खरा जागत ठरेल.

# माझ्या बालपणाच्या आठवणीतील दसरा

**ज्योतिर्मय साहित्य**



दसरा (विजयादशमी) हा आपल्या हिंदूचा प्रमुख सण असून, अश्विन महिन्यातील शुक्ल पक्षाच्या दहाव्या दिवशी हा साजरा केल्या जातो. या दिवशी दुर्गा देवीने नऊ दिवस चाललेल्या युद्धानंतर दहाव्या दिवशी महिषासुराचा वध करून मिळवलेला विजय आणि प्रभू श्रीरामाने रावणाचा वध करून मिळवलेला धर्मावर अधर्माचा विजय, या दोन गोष्टीचे प्रतिक म्हणून हा सण साजऱ्या केला जातो. म्हणजेच वाईटावर चांगल्याचा विजय होय. तसेच हा दिवस साडेतीन मुहूर्तांपैकी एक असल्याने खूप शुभ मानल्या जातो. त्यामुळे याच दिवशी नवीन कार्यांची सुरुवात करणे, सोने खरेदी कपडे खरेदी आदी गोष्टी करणे अत्यंत शुभ मानल्या जातात. दसऱ्याच्या दिवशी घरातील सर्वजण सकाळी लवकर उठून , स्नान झाल्यावर दारात झेंडूच्या फुलांचे तोरण बांधतात महिला वर्ग सुंदर रांगोळ्या काढतात, घरात देवाची प्रसन्नतेने पूजा होते. शमीचे झाड हे समृद्धीचे प्रतिक मानल्या जात असल्याने याच दिवशी शमीच्या झाडाची ही पूजा केली जाते. तसेच दसऱ्याला आपट्याची पाने सोन्यासारखी समजून एकमेकांना हे सोन्याचे प्रतिक देऊन शुभेच्छा देण्याची प्रथा आहे. अनेक ठिकाणी या दिवशी रावणाच्या पुतळ्याचे दहन केले जाते, जे वाईटावर चांगल्याच्या विजयाचे प्रतीक आहे. याच दिवशी शस्त्राची पूजा श्रीरामाच्या परंपरेलाअनुसरून केल्या जाते. तसेच वाहनांची ही पूजा केल्या जाते. याचे कारण म्हणजे वाईटावर विजय मिळविण्यासाठी वापरल्या जाणारी शस्त्रे, तसेच आपल्या वापरतील वाहने आदीची पूजा केली जाते.

याचे कारण म्हणजे या वस्तूंनी त्यांच्यातील आंतरिक ऊर्जेने वापरकर्त्याला सुरक्षित ठेवावे आणि त्याचे जीवन समृद्ध व्हावे,अशी या मागची भावना आहे. दसऱ्याच्या दिवशी सकाळी देवाच्या पूजेच्या वेळी पुस्तकांची पूजा केली जाते.पुस्तके आपल्याला ज्ञान देऊन आपले जीवन समृद्ध करत असतात.



गिरीश खं. वसेकर (देशपांडे)
नांदेड सिटी,सिंहगड रोड
पुणे ९४२२६५९४००

आपल्या महाराष्ट्रशिवाय भारतातील उत्तर, मध्य आणि पश्चिम राज्यांमध्ये, या सणाला दसरा म्हणतात (तसेच याला दशहरा देखील म्हणतात). या प्रदेशांमध्ये, या सणाला रामलीलाची समाप्ती होते असा हा दसरा सण सर्वांसाठी उत्साह आणि चैतन्याचं वातावरण घेऊन येतो.

दसरा या सण अनेक कथांनी आणि विविध प्रथांनी नटलेला आहे. तरीही या दिवसाचे खास महत्त्व म्हणजे वाईटावर चांगल्याचा विजय आणि पुढे नव्या ऊर्जेने करण्यात आलेली सुरुवात हे महत्वाचे आहे. भूतकाळात डोकावताना ,मला माझ्या बालपणातील दसरा आठवतो. माझ्या लहानपणी आम्ही परभणीला असताना सीमोल्लंघन झाले की घरी आल्यावर आई दारात पायावर गरम पाणी टाकून आत घ्यायचची व नंतर सतरंजीवर बसून धान्यात लपवलेली अंगठी शोधायाला लावायची. त्याच अंगठीने आई मला,बाबांना ओवळायाची. मग हातावर दिलेला प्रसाद खाऊन आई बाबांना नतमस्तक होऊन ही छोटी मूर्ती अंगावर असलेल्या नवीन कपड्यासह मित्रांना सोने वाटण्यासाठी धूम ठोकायची. तसेच ज्येष्ठांचे आशिर्वाद घेण्यासाठी जवळच्या संबंधातील घरोघरी जायची. सर्वत्र उत्साह,आनंद, गप्पा, गोडधोड खाणे या साऱ्या गोष्टी मनाला खुप प्रसन्न करत असत. या आठवणीत गेलो की ते तेव्हाचे सारे दृश्य लगेच दृष्टी पटलावर येतं आणि मन गहिवरून येतं काळाप्रमाणे आता सारं बदलत चालले आहे. तरीही या रीती परंपरा चालू राहल्या पाहिजेत तरच नात्यानात्यातील, मैत्रीतील ,धागा पक्का राहील. इतकं महत्व आहे आपल्या संस्कृतीतील जुन्या रीती आणि परंपराना.

असा हा दसरा सण.म्हणून तर म्हणतात,
दसरा सण मोठा नाही आनंदा तोटा.
अश्या या दसऱ्याच्या ( विजयादशमीच्या)
आपल्या सर्वांना खूप खूप शुभेच्छा

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559

# रा.स्व.संघ एक शताब्दी वर्षाचा वटवृक्ष

**ज्योतिर्मय साहित्य**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघ () हे भारतातील सर्वात मोठे स्वयंसेवी, सांस्कृतिक आणि सामाजिक संघटन आहे. भारतीय समाजात शिस्त, संस्कार, ऐक्य आणि राष्ट्रभक्ती जागवणे हे संघाचे ध्येय आहे. गेल्या शतकभरात ने भारतीय समाज व राजकारण या दोन्हींवर खोलवर परिणाम केला आहे.

स्थापना

२७ सप्टेंबर १९२५ रोजी नागपूर येथे डॉ. केशव बळीराम हेडगेवार यांनी रा.स्व.संघाची स्थापना केली. त्या काळात भारत स्वातंत्र्याच्या लढ्यात गुंतला होता. पण समाजात जातिभेद, प्रांतिकता, परकीय प्रभाव आणि असंघटितपणा होता. हेडगेवार यांनी ठरवले की, स्वातंत्र्य मिळाल्यावर टिकवण्यासाठी संघटित, संस्कारयुक्त व शिस्तबद्ध समाज आवश्यक आहे. त्यासाठी शाखा पद्धतीने स्वयंसेवक घडवण्याची संकल्पना उभी केली.

रा.स्व.संघाचे सरसंघचालक व त्यांचे योगदान–


१. डॉ. केशव बलिराम हेडगेवार १९२५१९४०

चे संस्थापक, २. माधवराव सदाशिवराव गोलवलकर (गुरुजी) १९४०१९७३., ३. बाळासाहेब देवरस १९७३–१९९४., ४. प्रो. राजेंद्रसिंह (राज्जू भैया) १९९४–२०००., ५. के. एस. सुदर्शन २०००२००९

६. डॉ.मोहनजी भागवत (२००९आजपर्यंत).

आज ला राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर बळकट करण्याचे नेतृत्व ते करत आहेत.

उल्लेखनीय मदतकार्ये




रा.स्व.संघाचे सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे आपत्ती व संकटकाळात केलेले सेवा कार्य.

१९४७ – फाळणीच्या वेळी : पाकिस्तानमधून आलेल्या निर्वासितांना अन्न, वस्त्र, निवारा व संरक्षण दिले.

१९७१ – बांगलादेश निर्वासित : भारतात आलेल्या निर्वासित शिबिरांमध्ये आरोग्य व अन्नसेवा केली.

१९८४ – भोपाल गॅस दुर्घटना : बाधितांना मदत, औषधे व निवारा पुरवला.

१९९९ – ओडिशा चक्रीवादळ : शेकडो गावात मदतकार्य व पुनर्बांधणी.

२००१ – गुजरात भूकंप : मोठ्या प्रमाणावर मदत व पुनर्वसन कार्य.

२००४ – त्सुनामी आपत्ती : तामिळनाडू व अंडमान भागात तातडीचे मदतकार्य.

२०१३ – उत्तराखंड पूर : यात्रेकरू व स्थानिकांना वाचवणे, निवारा व अन्नपुरवठा.



२०१८ – केरळ पूर : बचावकार्य, निवारा व पुनर्वसन.

२०२० – कोविड–१९ महामारी : अन्नधान्य, औषधे, किट्स, प्लाझ्मा डोनेशन – लाखो लोकांना मदत.

राजकीय व सामाजिक संदर्भ

रा.स्व.संघ स्वतःला राजकीय नसल्याचे सांगते, परंतु त्याच्या विचारसरणीतून भारतीय जनसंघ (१९५१) आणि पुढे भारतीय जनता पक्ष (१९८०) निर्माण झाले.

रामजन्मभूमी आंदोलन, स्वदेशी चळवळ, ग्रामीण विकास, शिक्षण या सर्व क्षेत्रात संघाचा प्रभाव आहे.

आजच्या भारतीय राजकारणात रा.स्व.संघाची भूमिका महत्त्वाची मानली जाते.

संघ प्रेरित संघटना–

रा.स्व.संघाच्या प्रेरणेने अनेक संघटनांची स्थापना झाली :

अखिल भारतीय विद्यार्थी परिषद : विद्यार्थ्यांची चळवळ

भारतीय मजदूर संघ : कामगार चळवळ

सेवा भारती : झोपडपट्टी, आदिवासी व ग्रामीण सेवा

वनवासी कल्याण आश्रम : आदिवासी विकास

विद्या भारती : शैक्षणिक संस्था

विश्व हिंदू परिषद : सांस्कृतिक व धार्मिक कार्य

शिस्त, राष्ट्रभक्ती व सेवा कार्य यासाठी ओळखला जातो.

जगातील सर्वात मोठे स्वयंसेवी संघटन.

आपत्ती व संकटात केलेले मदतकार्य सर्व सामान्या पर्यंत पोहचण्याचे कार्य केले जाते.

विरोधकांच्या मते रा.स्व.संघ हिंदुत्व विचारसरणी पुढे नेतो.

राजकारणावर अप्रत्यक्ष प्रभाव टाकतो.

गांधीहत्ये नंतर संशयास्पद ठरला, पण न्यायालयीन चौकशीनंतर निर्दोष ठरला

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने गेल्या शंभर वर्षांत भारताच्या समाजजीवनावर, संस्कृतीवर आणि राजकारणा वर ठसा उमटवला आहे. हेडगेवारां नी संघटनेची पायाभरणी केली, गुरुजींनी वैचारिक दिशा दिली, बाळासाहेब देवरसां नी समावेशकते चा मार्ग दाखवला, राज्जू भैय्यांनी सेवा कार्य बळकट केले, सुदर्शनजीं नी स्वदेशी अर्थनीती वर भर दिला आणि डॉ.मोहन भागवतजींनी आधुनिक काळाशी सुसंगत भूमिका घेतली.

आपत्ती काळातील मदतकार्य, सामाजिक सेवा आणि राष्ट्रभक्तीचे संस्कार यामुळे केवळ वैचारिक संघटना नसून, एक सेवाव्रती व समाजाभिमुख चळवळ ठरते.

# मर्यादा पुरुषोत्तम प्रभू श्रीरामचंद्र...!

**ज्योतिर्मय साहित्य**

विजयादशमी निमित्त सर्वांना हार्दिक शुभेच्छा.

मर्यादा पुरुषोत्तम श्रीराम
त्यांचा आदर्श सर्वांनी घ्यावा
मानव रूपात जन्माला आले
त्यांचा त्याग जाणून घ्यावा

अनेकदा वाचण्यात येते की, मर्यादा पुरुषोत्तम प्रभू श्रीरामचंद्र हे, भगवान विष्णूचा सातवा अवतार होते. माता कौसल्या व महा पुण्यवान राजा पिता दशरथ यांच्या पोटी प्रभूने जन्म घेतला. खरंच ते, माता आणि पिता किती पुण्यवान असावेत. ती विश्वात गाजून गेलेली अयोध्या नगरी धन्य झाली ही भारतभूमी धन्य झाली पित्याच्या वचनाचा पालन कर्ता आदर्श पुत्र, आदर्श राजा आणि आदर्श पती म्हणून ओळखले जाते. मर्यादा ठेवून कशाप्रकारे जीवन जगले पाहिजे हे प्रभू श्रीरामचंद्राच्या संपूर्ण जीवन चरित्रातून दिसून येते. म्हणतात ना की, नियतीच्या पुढे कोणाचे चालत नाही तसेच प्रभूच्या बाबतीत सुद्धा झाले. राज्याचा पुत्र असताना सुद्धा चौदा वर्षाचा वनवास पत्नी देवी सीता व बंधू लक्ष्मण सहीत हसत, हसत राजमहाल,राजथाट सोडून वनवासात निघून गेले. प्रभू श्रीरामाच्या या महान त्यागातून आजच्या समाजाला खूप काही शिकवण मिळते. आजकाल बघितले तर समाजातील काही लोक धनसंपत्तीच्या मोहापायी एकमेकांना मारहाण करतात,एकमेकांचा जीव घेतात, एवढेच नाही तर सारी मर्यादा पार करतात अशा विकारी, विचारी माणसांनी एकदातरी मर्यादा पुरुषोत्तम प्रभू श्रीरामचंद्राना वाचायला शिकले पाहिजे. धन आणि दौलत कितीही असले तरी ते, शेवटपर्यंत टिकून राहत नाही मात्र इतरांच्या सुखासाठी स्वतः कशाप्रकारे त्याग करून जगले पाहिजे ही शिकवण प्रभूच्या जगण्यातून दिसून येते म्हणूनच म्हणतात की, ''त्यागा मधूनी पुण्य मिळे'' आज याच महान त्यागातून प्रभूला वनवासात अनेक तपस्वी ऋषी, मुनींचे आशीर्वाद मिळाले एवढेच नाही तर त्यांच्या पदस्पर्शाने जमीनीवर शिळा होऊन पडलेल्या सती अहिल्येचा उध्दार झाला. किती ते पुण्यवान राजा असावेत ज्यांची अनेक वर्षापासून तपस्वी ऋषीमुनींनी दर्शन घेण्यासाठी वाट बघत होते. त्यात अशी एक महा तपस्वी असलेली ''शबरी'' होती अनेक वर्षापासून प्रभू येण्याची वाट बघत होती आणि दररोज आपल्या झोपडीच्या समोर अंगणातून फुलांची सजावट करत होती तिचे संपूर्ण आयुष्य रामनाम जप करण्यात गेले. जेव्हा, प्रभू श्रीरामचंद्र बंधू लक्ष्मण सहीत सीतेच्या शोधात निघाले होते तेव्हा, अचानक एक दिवस त्या महा तपस्वी शबरीच्या झोपडीजवळ पोहोचले असता.त्या मातेने प्रभूला ओळखले आणि माझ्या प्रभूला काहीतरी खाऊ घालण्यासाठी म्हणून बोरी तोडायला गेली. गोड बोरी असल्यास चाखून टोपलीत ठेवायची आणि आंबट बोरी असल्यास ती फेकून द्यायची त्या मातेने प्रभूचे स्वागत नुसते फुलांनीच केले नाही तर आपल्या अश्रूने ते पावन चरण धुतले आणि तिच्यातील अफाट भक्ती, विश्वास, स्नेह, त्याग, प्रामाणिकपणा बघून प्रभूने उस्ट्या बोरी मोठ्या आवडीने खाल्ले विचार करण्याची गोष्ट आहे जो माणूस सत्कर्माने स्वंयम प्रकाशित असतो त्याच्याजवळ कोणताही जात, धर्म, पंथ नसतो तर त्याच्यातील माणुसकी ही सर्वात श्रेष्ठ असते तो क्षण आणि ती माया आणि तो आदर आजच्या या भूतलावर राहणाऱ्या प्रत्येक मनुष्य प्राण्याला माणुसकी धर्माची शिकवण देणारा आहे.






रामनामाचा जप करती
रामनामात तल्लीन झाले
आदर्श, कीर्तीवंत राजाराम
तिन्ही लोक राममय झाले

ज्याच्या मनात सकारात्मक विचार असतात, सर्वाप्रती प्रेम असतो, आपुलकी असते, मर्यादा असते, माणुसकी धर्म असतो, त्याग असते,बलिदान असते, सत्य बोलण्याची ताकद असते, सत्याच्या वाटेवर चालण्याचा प्रयत्न असतो, मनात भक्ती असे, संघर्षाला गुरू मानतो, दया, क्षमा, शांती, नि:स्वार्थ भावना असते, इतरांप्रती सदभावना असते आणि व्यर्थ गोष्टींकडे जो लक्ष देत नाही अशा माणसावर खऱ्या अर्थाने प्रभूची कृपादृष्टी असते. आणि याच गुणांकडे बघून प्रभू त्यावर प्रसन्न होतात. प्रभू श्रीराम चंद्रानी राजा निषाद यांना आपला मित्र मानले, सोबतच बघितले तर पंढरपूरी राहणाऱ्या विठूरायांनी सुद्धा संत चोखामेळा या महान भक्ताला आपलेसे करून घेतले कारण त्यांचे मन हे सदैव निर्मळ होते. ते आपले कर्म करताना क्षणभर सुद्धा ईश्वराला विसरले नाही म्हणून संत चोखामेळा म्हणतात की, ''टाळी वाजवावी गुढी उभारावी, वाट ती चालावी पंढरीची'' त्यांच्यात ईश्वराप्रती किती भक्ती असेल...? की, प्रभूनी त्यांची जात धर्म बघितले नाही तर त्यांचे सकारात्मक विचार बघून त्यांच्यात एकरूप झाले आज सारा विश्व त्यांच्या नात्याला ओळखत आहे. प्रभू हा चरचरात वास करतो, पशू, पक्षात,झाडांझुडपात असतो, सर्वांमध्ये असतो मात्र आपण त्यांची महिमा ओळखत नाही. हिरवेगार झाडांवर वार करून झाडे तोडत असतो हे किती निर्दयीपणा म्हणावे...? खरंच ह्या निर्दयी माणसांवर प्रभूची कृपादृष्टी होईल...? रामनाम असे हे एक श्रेष्ठ नाव आहे की माळेतील एकसे आठ मणी जपल्यासारखे होते. रामनामाचा जप आणि गजर करणारे ऋषी मुनींनी रामायण नावाचा महान ग्रंथ लिहिला आज सारा विश्व वाचतो मात्र त्यातून प्रभू श्रीरामचा आदर्श घेत नाही ही आजची वास्तविकता आहे. मर्यादा पुरुषोत्तम प्रभू श्रीरामाला ओळखण्यासाठी आधी त्यांना वाचणे गरजेचे आहे तेव्हाच ते कळत असतात. पण,आजचा माणूस मात्र व्यसनाधीन होऊन जगत आहे, खोट्याला साथ देऊन स्वतःला धोका देत आहे, संस्कृती तर कमीच झाली मात्र स्वार्थ कुटून भरलेला दिसून येतो. कटकारस्थान संपण्याचा नावच घेत नाही. आणि दीन, दुबळ्यांची हाक कोणी ऐकेना अशी आजची परिस्थिती निर्माण झालेली बघायला मिळत आहे. म्हणून आज माणूस माणसात दिसत नाही आणि माणुसकी राहिली नाही तर मर्यादा पुरुषोत्तम प्रभू श्रीराम कुठून मिळणार...? रामनामाचा जप करण्यासाठी मन तेवढे निर्मळ असावे लागते त्यालाच प्रभू श्रीराम मिळतात. असे सत्कर्म करणारे आत्मे होते म्हणून ते राममय झाले आणि भवसागर पार केले.

राम नाव घ्यावे मुखी
अन् सत्कर्म करावा
तेच होतील कर्म श्रेष्ठ
अन् रामाला तेथेच पहावा

मनुष्य जातीत जन्म घेऊन सुद्धा मर्यादा पुरुषोत्तम प्रभू श्रीरामानी आपले कर्म अवतार संपेपर्यंत करत राहिले आणि या भूतलावर राहणाऱ्या सर्वाना माणुसकीचा संदेश देत राहिले, खूप शिकवण दिली, स्वतः ईश्वर असताना सुद्धा संघर्ष केले मात्र दु:ख देऊन कोणाला बोलले नाही ही शिकवण प्रभूची फार मोलाची आहे.आजचा समाज मात्र कुठे जात आहे कळतच नाही. म्हणून राम हे पवित्र नाव मुखात सदैव ठेवावे आणि आपले सत्कर्म चालू ठेवावे. मनुष्य प्राण्याला माणुसकीची आणि आदर्श व्यक्ती म्हणून कशाप्रकारचे बनले पाहिजे ही प्रभू रामाकडून मिळते.माणसं बरेच असतात पण, कधी काळी, माणसालाच ''देवमाणूस'' म्हणून पुजले जाते हे फुकटच नाही. म्हणून राम हे एक महान नाव मुखात ठेवून माणसासारखे जगण्याचा प्रयत्न करावा.

# विजयादशमी : दसरा

**ज्योतिर्मय साहित्य**

दरवर्षी नवरात्र हे नऊदिवस आणि नऊ रात्री नंतर दहाव्या दिवशी संपते पण यंदा हे दहा दिवस पूर्ण झाल्यावर अकराव्या दिवशी समाप्त होते आहे. नवरात्रीचे नऊदिवस, नऊरात्री खूपच धामधूमीचे गेले. नऊदेवींच्या नऊ सुरेख रूपांचे दर्शन झाले. आजच्या दिवशी नवरात्रीची पुरण, गोडधोड करुन देवाला नैवेद्य दाखवुन, घट, दिवा हलवुन सांगता केली जाते. काही ठिकाणी आदल्या दिवशीसुद्धा समाप्ती होते.

दहावा दिवस म्हणजेच दसरा ! यालाच दशहरा, विजयादशमी असेही म्हणतात. हा भारतीय हिंदूंच्या सणांपैकी खूप मोठा आणि महत्वाचा सणं ,उत्सव मानला जातो. नवरात्रीच्या नऊरात्र, नऊदिवस अविरत युद्ध करून दहाव्या दिवशी दुर्गा देवीने महिशासूर, रक्तबीज, शुंभ, निशुंभ अशा क्रूर, उन्मत्त राक्षसांचा नाश करून विजय संपादन केला आणि तिन्हीलोकांना त्यांच्या त्रासातुन मुक्त केले म्हणून हा विजयाचा मोठ्ठा दिवस विजयादशमी म्हणून धुमधडक्यात साजरा करतात. हा मानाचा दिवस साडेतीन मुहूर्तांपैकी एक मानला जातो. यादिवशी सर्व शुभ कार्यांची सुरुवात केली जाते. नवीन लहान मोठ्ठ्या सर्व वस्तूंची, वाहनांची, घराची खरेदी केली जाते. आपट्याची पाने, झेंडूच्या फुलांनी बाजार नुसता फुलतो. घरे, दुकाने, वाहने, यांची झेंडूचे हार, माळा यांनी सजावट केली जाते.पुरण, गोडधोड, मिठाया बनवून खाल्या जातात. सर्व आप्तेष्ट एकमेकाना भेटून हा सणं खूप आनंदाने साजरा करतात.

तीन रात्री सरस्वती निद्रा करते आणि दसऱ्याला ती जागी होते असे मानून तिचे प्रतिक म्हणजे पाटी,पुस्तके, वह्या यांची विद्यार्थी पूजा करतात.

आजच्या दिवशी अश्मंतक म्हणजेच आपट्याच्या पानांना सोने समजून विजयादशमी या सणाचे महत्व प्रत्येक प्रांतात, राज्यात खूप वेगवेगळे आहे त्यामुळे तो साजरा करण्याच्या पद्धतीही वेगवेगळ्या आहेत. हे दहा दिवस बऱ्याच राज्यात रामाने रावणावर केलेल्या विजयाचे स्मरण म्हणुन साजरे करतात. काही भागात रामकथेतील कथावर आधारीत विविध नाटके सादर करतात त्यांना रामलीला म्हणतात. शेवटच्या दहाव्या दसऱ्याच्या दिवशी गावातील सर्वांत मोठ्या मैदानामध्ये पुठ्ठे, लाकडे, कापड यांनी खूप मोठ्ठा भव्य दहा तोंडे असलेल्या रावणाचा पुतळा बनवून त्यात भरपूर फटाके, शोभेची दारू भरून उभा करतात. मग रामलीलेतील रामाचा अवतार घेतलेला माणूस त्या रावणाला धनुष्यातून अग्निबाण सोडून मारतो आणि रावणाला ठार मारतो, त्याचे दहन करतो. हा खूप मोठा आणि सुरेख सोहळा असतो आणि तो पाहण्यासाठी गावोगावचे असंख्य लोक येतात. सर्व दुष्ट शक्तींचा नायनाट होऊन या दिवशी आनंदाचे, संपन्नतेचे, शांततेचे रामराज्य सुरु होते असे मानले जाते. हे रावणदहन वाईटाचा नाश असल्याचे प्रतीक मानले जाते.

हा दिवस रामायण आणि महाभारत दोन्ही काळात घडलेल्या चांगल्या दिवसाची आठवण म्हणूनच साजरा होतो. या दिवशी रामाने रावणाचा नाश करून विजय मिळवला होता तर पांडवांनी त्यांचा वनवास आणि अज्ञातवास यशस्वीरित्या पार पाडून या दिवशी शमीच्या झाडावर लपवून ठेवलेली सर्व शस्त्रे काढून त्यांची पूजा केली आणि त्यांचे राज्य परत मिळवले म्हणून या दिवशी शस्त्रांची पूजा करतात. त्याची आठवण म्हणुन या दिवशी पुरुष नवीन कपडे घालून, डोक्यावरील शिरपेचात टोपी किंवा फेट्यात नवरात्रातील घटामध्ये उगवलेले धान्य मोठ्या दिमाखात खोचून गावाचे सीमोल्लंघन करतात आणि घरी येताना आपट्याची पाने तेजाचे, विजयाचे प्रतिक आहे म्हणून सोनेच मानून घरी आणतात. दारात त्यांचे पाय धुवून, औक्षण करून सुवासिनी त्यांना सन्मानाने स्वागत करतात. मग ही आपट्यांची पाने सोने मानून एकमेकांना आनंदाने देतात.




**सौ. स्नेहा मुसरीफ, पुणे**

आपट्यांच्या पानांना सोने का समजतात याबद्दल एक पौरणिक कथा आहे.

रघुराजाने सर्वस्वदक्षिणा यज्ञ केला. या यज्ञा नंतर आपल्याजवळील सर्व संपत्ती लोकांना दान करून टाकायची असते, तसे त्याने केले. त्यानंतर त्याच्याकडे कौत्स मुनी त्यांच्या यज्ञासाठी दान मागण्यासाठी रघुराजाकडे आले. त्यांनी चौदा सहस्त्र मुद्रांची मागणी केली. रघुराजाने तर सर्व कोषागार रिकामे केले होते. पण धर्माने राज्य करणाऱ्या राजाला ब्राह्मणाला तसेंच विन्मुख पाठवणे पटणारे नव्हते. त्याने देवांचा खजिनदार कुबेर याच्यावर आक्रमण करण्याचे निश्चित केले. कुबेर खूप घाबरला आणि त्यानेअमाप धनसंपत्ती राज्याच्या वेशीबाहेरील आपट्याच्या झाडाखाली आणून ठेवली.रघुराजाने ती सगळी संपत्ती कौत्समुनीना देऊ केली, पण त्यांनी फक्त चौदा सहस्त्र मोहराच घेतल्या. मग ब्राह्मणासाठी दिलेल्या संपत्तीवर आपला काय अधिकार आहे,असे म्हणून त्याने सर्व प्रजेला त्यांना हवी तेवढी संपत्ती घेऊन जाण्यास सांगितले.तेंव्हा सारी प्रजा तिथे आली आणि आनंदाने संपत्ती घेतली. या साऱ्याचा साक्षीदार हे आपट्याचे झाड होते. त्याची आठवण म्हणून दसऱ्याला त्या झाडाची पूजा करण्याची प्रथा पडली.

मग संपत्ती,सोने म्हणून याच्या पानाला मान,महत्व दिले आणि म्हणूनच या मंगल दिवशी लोक एकत्र भेटुन आनंदाने ते एकमेकाना देतात.यामुळे आदानप्रदान शीलता वाढते. उत्साह वाढतो. त्यानिमित्ताने का होईना लोक आपट्याची झाडे लावून त्याचे संवर्धन करतील, अशी त्यामागे भावना आहे.

पण दुर्दैवाने लोक ती भावना समजून न घेता त्यासाठी त्यादिवशी ती झाडेच अक्षरशः तोडतात. कित्येकाना तरी खरे आपट्याचे झाड,पान ठाऊकही नसते, विशेषतः शहरात! मग आपट्याची म्हणून त्याच्यासारख्या दिसणाऱ्या पानांची झाडे सुद्धा ओरबाडली जातात. आणि हे नकली सोने एकमेकाना केवळ प्रथा म्हणून देतात. याचा खरंच खेद वाटतो. त्यापेक्षा प्रत्येक चांगल्या प्रसंगांची, सण,उत्सव किंवा वाढदिवसासारखे कार्यक्रम असले की त्याची छान आठवण म्हणून किमान एकतरी झाड लावून ते वाढवावे किंवा जो पैसा छोट्या,मोठ्या एव्हेन्ट मध्ये विनाकारण केवळ आपल्या आनंदासाठी, डामडौल म्हणून खर्च करतो, तोच पैसा अनाथ,अपंग,गरजू व्यक्तींना दिला तर तो आनंद त्याही पेक्षा मोठा असतो हे लक्षात येईल.

एका माणसाच्या आनंदात कित्तीतरी गरजूंच्या आयुष्यात आनंद देऊन तो डोळ्यांनी पाहण्याचे सुख तर आपल्याला मिळेलच, पण त्यांचे आशीर्वाद, सदिच्छाही मिळतील.समाजसेवेचे पुण्यही लाभेल. असा जर दसरा साजरा केला तर खऱ्या अर्थाने अभिमानाने म्हणता येईल, ''दसरा सणं मोठा, नाही आनंदा तोटा.''

***